

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com  नवी दिशा... नवे विचार.....  email:rajyaloktantra75@gmail.com

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

मुक्तिसंग्राम लढ्यातील सर्व हुतात्म्यांना अभिवादन

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१७८ | गुरुवार दि.१७ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### राज्यात कुराशच्या बनावट प्रमाणपत्रांचे रॅकेट

पुणे : शहर पोलिस दलाच्या शिपाई भरती प्रक्रियेत कुराश या खेळाची बनावट प्रमाणपत्रे तयार करून खेळाडू आरक्षणाचा गैरफायदा घेतल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर या रॅकेटची व्याप्ती राज्यभर असल्याचे समोर आले होते. दरम्यान, आता या प्रकरणात कोल्हापूरच्या पुनगावकर दाम्पत्याला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी (दि.१०) कोल्हापूरातून ताब्यात घेतले. श्रुती पुनगावकर (वय ४५), धैर्यशील पुनगावकर (वय ५१, दोघे रा. कोल्हापूर) अशी अटक केलेल्या दाम्पत्याचे नाव आहे.या प्रकरणात गेल्या आठवड्यात महाराष्ट्र राज्य कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नागर आणि सचिव शिवाजी साळुंखे या दोघांना अटक केली आहे. आत्तापर्यंत या प्रकरणात चौघांना अटक केली असून, इतर काही जणांकडे अद्याप चौकशी सुरू असल्याचे गुन्हे शाखेच्या अपर पोलिस आयुक्त तेजस्वी सातपुते यांनी सांगितले.कुराश असोसिएशनच्या पदाधिका-यांनी गेल्या अकरा वर्षांत तब्बल एक हजारांहून अधिक प्रमाणपत्रे राज्यात वाटली आहेत. या प्रमाणपत्रांच्या आधारे शासनाच्या विविध विभागांत किती जणांनी नोक-या मिळवल्या, याची पडताळणी पोलिस करत आहेत

### बारामतीत एसटी बस उलटली;विद्यार्थी जखमी

बारामती : बारामती तालुक्यातील सुपे घाटात १६ सप्टेंबर सकाळी एक भीषण अपघात घडला. विद्या प्रतिष्ठानच्या शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस चालकाचा ताबा सुटल्याने रस्ता सोडून खाली कोसळली. या घटनेत अनेक शाळकरी मुले जखमी झाली असून, घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली.ही एसटी बस चौफुल्याकडून सुप्याच्या दिशेने विद्या प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांना घेऊन जात होती. सुपे घाटातील वळणावर अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस संरक्षक कठडा तोडून रस्त्याच्या बाजूला कोसळली. बस उलटल्याने आत बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये घबराट पसरली आणि एकच आक्रोश सुरू झाला.घाटातील अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक ग्रामस्थ व परिसरातील प्रवाशांनी तातडीने मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. बसमधील जखमी विद्यार्थ्यांना तातडीने बाहेर काढून उपचारासाठी नजीकच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### इगतपुरीजवळ भीषण अपघात; चार ठार

ठाणे : गेल्या काही दिवसांत राज्यात अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. भरधाव वेगात असणारी वाहने, खराब रस्ते यामुळे प्रामुख्याने अपघात होत आहेत. अशातच आता मुंबई उपनगरातील जोगेश्वरी येथील एका कुटुंबावर देवदर्शनावरून परतताना काळाने घाला घातल्याची दुर्दैवी घटना ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात असलेल्या आटगाव येथे घडली आहे.या घटनेत एकाच कुटुंबातील चार जण ठार झाले असून सहा जण जखमी झाले आहेत. त्र्यंबकेश्वर येथून देवदर्शन करून घरी परतत असताना हा अपघात झाला आहे. या घटनेत इर्टिगा या चारचाकी वाहनाचा चक्काचूर झाला आहे. ज्या वाहनाचा अपघात झाला आहे, त्या वाहनाने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनाला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.गोरखपूर येथील रहिवासी असलेले जैस्वाल कुटुंबीय सध्या मुंबईतील जोगेश्वरी येथे वास्तव्यास होते. ते सर्वजण त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी गेले होते आणि दर्शन आटोपून परतीच्या प्रवासात असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१६ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६६.५० क्विंटल | २,१०० | ३,१०० | २,८३५ |
| ज्वारी/हायब्रिड: ९२.५० क्विंटल | ३,००१ | ५,७४५ | ४,१२१ |
| मका/लोकल: १३.०० क्विंटल | २,३०० | २,७४० | २,५२० |
| तूर : ३.०० क्विंटल | ८,१९० | ८,१९० | ८,१९० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ७,७३० | ७,७३० | ७,७३० |
| बाजरी: ४८.५० क्विंटल | २,८०० | ३,००२ | २,९०९ |
| मुग: ९.०० क्विंटल | ९,००० | ९,६०१ | ९,२७९ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |
| हरभरा: ९.५० क्विंटल | ५,६५१ | ६,२०० | ५,९८० |

बीड-जालन्यात ४२ दिवसांहून अधिक पावसाचा खंड

# मराठवाड्यात टंचाईची चिन्हे गडद

## ५,५६० गावांना पावसाच्या तुटीचा फटका, २७८ महसूल मंडळांत ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस

छ. संभाजीनगर | प्रतिनिधी



**मराठवाड्यात पावसाने पुन्हा ओढ दिल्याने खरीप पिकांसह पिण्याचे पाणी, चारा आणि जलसाठ्याचे संकट गडद होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. १५ सप्टेंबरपर्यंत विभागातील ४९६ महसूल मंडळांपैकी तब्बल २७८ मंडळांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. या मंडळांच्या कार्यक्षेत्रातील तब्बल ५ हजार ५६० गावांना पावसाच्या तुटीचा फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर विभागीय प्रशासनाने पाऊस, पावसातील खंड, पिकांची स्थिती, जलसाठा, चारा आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेचा निरीक्षणात्मक अहवाल शासनाला सादर केला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मराठवाड्यातील पावसाची आणि पिकांची परिस्थिती तपासून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्यानंतर हा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला. त्यामुळे आगामी काळात पावसाची स्थिती कशी राहते, याकडे प्रशासनाचे लक्ष लागले आहे.**

मराठवाड्यात सुमारे साडेआठ हजार गावे असून, एकूण ४९६ महसूल मंडळे आहेत. त्यापैकी २७८ मंडळांमध्ये १५ सप्टेंबरपर्यंत अपेक्षित पावसाच्या तुलनेत ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला. आणखी २१८ मंडळांमध्ये ५० ते ७५ टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे विभागातील मोठ्या भागावर पावसाच्या कमतरतेचे सावट कायम आहे. विभागातील ७६ तालुक्यांपैकी ४७ तालुक्यांमध्ये कमी पावसाची नोंद झाली आहे. केवळ दोन तालुक्यांत अपेक्षित पावसाच्या तुलनेत १०० टक्के पाऊस झाला आहे. २७ तालुक्यांमध्ये ७५ टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला असला, तरी ३८ तालुक्यांमध्ये पर्जन्यमान सर्वाधिक कमी असल्याचे पान २ वर

### जलसाठा समाधानकारक; मात्र टंचाईचे सावट

मराठवाड्यातील काही मोठ्या प्रकल्पांमध्ये समाधानकारक जलसाठा असला, तरी सर्वच भागांमध्ये हीच स्थिती नाही. कमी पाऊस झालेली महसूल मंडळे, दीर्घ पावसाचे खंड, लघु-मध्यम प्रकल्पांमधील कमी जलसाठा आणि काही भागांत वाढत असलेली टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज यामुळे प्रशासनाची चिंता वाढली आहे. पावसाची तूट असलेल्या ५ हजार ५६० गावांतील खरीप पिकांची स्थिती, चाऱ्याची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याचे नियोजन आणि जलसाठ्याचा आढावा प्रशासनाने घेतला आहे. आता आगामी काळात पाऊस किती आणि कधी होतो, यावर मराठवाड्यातील टंचाईची तीव्रता मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे.

## शिवसेना नेमकी कोणाची सुनावणी उत्कंठावर्धक वळणावर




नवी दिल्ली -मुंबई | प्रतिनिधी

सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतचं प्रकरण आता अत्यंत उत्कंठावर्धक वळणावर आलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे वकील कपिल सिब्बल यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यनेतापदाच्या निवडीवर आक्षेप घेतला होता. त्यांनी हे पद कायदेशीर नसल्याचा युक्तिवाद केला होता. त्यांचा हाच युक्तिवाद एकनाथ शिंदे यांचे वकील नीरज किशन कौल यांनी खोडून काढण्याचा प्रयत्न केला. एकनाथ शिंदे यांची मुख्यनेतापदी झालेली निवड कशी योग्य आहे? याबाबत कौल यांनी युक्तिवाद केला.

विशेष म्हणजे निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह देताना कोणत्या गोष्टींचा विचार केला आणि त्या देत असताना कुठली पद्धत योग्य ठरली, याबाबत कौल यांनी विश्लेषण केलं. एकीकडे कौल यांच्याकडून वारंवार विधीमंडळ पक्षाच्या संख्येबाबतच्या युक्तिवादावर जोर धरला जात असताना सुप्रीम कोर्टाने राजकीय पक्ष पाहून चिन्ह दिलं जातं, अशी महत्त्वाची टिप्पणी केली. यामुळे हे प्रकरण प्रचंड उत्कंठावर्धक वळणावर आल्याचं बघायला मिळत आहे. नीरज किशन कौल यांना आज युक्तिवाद करण्यासाठी केवळ अर्धा तासांचा वेळ मिळाला. आपण उद्या पुन्हा युक्तिवाद करु, असं नीरज किशन कौल यांनी कोर्टात सांगितलं.सध्याचा वाद हा एकनाथ शिंदे यांच्या नियुक्तीचा नाही. कोणता मूळ पक्ष हा सध्या मुद्दा आहे. शिंदे यांनी आमदार आणि मंत्री म्हणून जे काम केलं ते लोकप्रतिनिधी म्हणून केलं. त्यावर आक्षेप घेण्याचा प्रश्नच नाही, पान २ वर

# पाटोद्यात जरांगे पाटलावर उपचार प्रकृती खालावली ; मुंबई गाठणार



पाटोदा | प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या आंदोलनासाठी मुंबईच्या दिशेने निघालेल्या मनोज जरांगे पाटील यांची उपोषणामुळे प्रकृती प्रचंड खालावली आहे.बुधवारी सकाळी ११ वाजता पाटोद्याहून पुढच्या मुक्कामाला म्हणजे श्रीगोंद्याला रवाना होणार होते. मात्र, आज सकाळपासून प्रकृती प्रचंड खालावली त्यामुळे त्यांना जागेवरुन हलणेही अशक्य झाले आहे. त्याच्यावर पाटोदा येथेच उपचार करण्यात आले सलाईन देखील लावण्यात आली मात्र ते उद्या मुंबईकडे जाणार असल्याचे त्यांनी पान २ वर

### जीआर प्रमाणे काम झालं पाहिजे

मला ड्राफ्टबद्दल आज कळालं, मला समाजाशिवाय तुमच्याशिवाय कोण आहे. माझ्या शिवराळ भाषेबद्दल बोलतात, जरांगे पाटील आधी चांगलं बोलले, त्यावेळी चर्चा झाली नाही का, कोणत्या मंत्र्यांनी झक मारली म्हणून ते तसं बोलले. शिबीर कशाला लावायचे हे विखे पाटलाला माहीत नाही, गोपीनाथ मुंडे साहेबांच्या काळात लावले होते. शिंदे समितीच्या जीआर प्रमाणे काम झाले पाहिजे, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे.

### मंत्री पाटोद्याला येणार आहेत

१३ पैकी १२ मागण्या मान्य झाल्या पण हैदराबाद जीआरचे काय झाले ते मुख्यमंत्र्यांनी सांगावं, हैदराबाद गॅझेटचा सुधारित जीआर काढावा. पश्चिम महाराष्ट्रामधील बागायतदाराला आरक्षण नाही का? असा सवालही जरांगे पाटील यांनी केला. तसेच, विखे पाटील, शिवसेनेचा एक मंत्री अन्य दोन मंत्री पाटोद्याला येणार आहेत असं मला समजलं. पण, काम करत असतील तरच या, असे आवाहन जरांगे पाटलांनी सरकारला केलं आहे.

## पुण्यात मुख्यमंत्र्यांना घेराव घालण्याचा प्रयत्न

पुणे | प्रतिनिधी

एकीकडे मनोज जरांगे पाटील हे मुंबईच्या दिशेने निघाले आहेत तर दुसरीकडे राज्यभर मराठा आंदोलनक आक्रमक झाल्याचं दिसून येत आहे. पुण्यात मराठा आंदोलकांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच घेराव घालण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निवासस्थानी आले असला मुख्यमंत्र्यांना घेराव घालण्याचा प्रयत्न मराठा आंदोलकांनी केला. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत गोंधळ घालणाऱ्या आंदोलकांना ताब्यात घेतल्याने परिस्थिती नियंत्रणात आली.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निवासस्थानी गणेशाचं दर्शन घेण्यासाठी आले होते. यावेळी मराठा आंदोलकांनी या ठिकाणी पान २ वर

## तुकाराम मुंढेंनी रूग्णालयाच्या लुटीचा एक्स-रे काढला!

मुंबई | प्रतिनिधी



महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी रुग्णालयांमधील वैद्यकीय साहित्याच्या किमतींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी खरेदी किंमत आणि एमआरपी यांमधील मोठ्या तफावतीकडे लक्ष वेधले. मुंढे यांच्या म्हणण्यानुसार, एका खासगी रुग्णालयाने आयव्ही इन्फ्युजन सेट ११.०५ ला खरेदी केला, तर त्याची एमआरपी ३२५ होती. हा फरक अंदाजे २,८४१% इतका आहे. त्याचप्रमाणे,६.७५ किमतीची सिरिंज ५७.२० ला विकली गेली आणि २९.४१ किमतीचा कॅथेटर ३१० ला विकला गेला. त्यांनी रुग्णांसाठी किमतींमध्ये पारदर्शकतेची गरज असल्याचे अधोरेखित केले.

मुंढे यांच्या मते, अशा परिस्थितीत रुग्णांना रुग्णालयाच्या बिलावर नमूद केलेली किंमत स्वीकारण्यास भाग पडते. समस्या केवळ किमतीची नाही, तर रुग्णांसाठी अचूक माहिती आणि पारदर्शकतेचा अभाव ही देखील आहे. त्यांनी सांगितले की, अनेक वैद्यकीय उत्पादनांची एमआरपी रुग्णालयाच्या खरेदी किमतीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त पान २ वर

## शिक्षण विभागातच अवतरले दारूच्या नशेत तरर झालेले गुरुजी

बीड | प्रतिनिधी

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि शिक्षण देणारे शिक्षक हे गुरु असतात मात्र त्या गुरुने गुरु सारखे आचरण ठेवणे गरजेचे असते परंतु याच गुरुजींचा चेहरा समोर आला तो आज जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात दारूच्या नशेमध्ये तर्र असलेला हा शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्याऐवजी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना धडे देताना दिसून आला.

याचे असे झाले की बीड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभाग हा सर्वात मोठा विभाग आहे प्रामुख्याने नेहमी या ठिकाणी वर्दळ असते परंतु आज फारसी गर्दी नसती तरी दुपारी दीडच्या सुमारास एक शिक्षक चक्क दारूच्या नशेमध्ये शिक्षण विभागात आले तेथील कर्मचाऱ्यांना पान २ वर

**हा सर्व नाट्यप्रयोग शिक्षण विभागात सुरू असताना शिक्षण अधिकारी आपल्या केबिनमध्ये होत्या असे समजते त्यांना याची कल्पना कर्मचाऱ्यांनी दिली की नाही माहित नाही परंतु आता मुख्य कार्यकारी अधिकारी शिक्षणाधिकारी काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागले आहे.**

# रेल्वे मार्गाची पूर्तता म्हणजे स्व.काकू,स्व.मुंडे,स्व, देशमुख यांना खरी आदरांजली

बीड | प्रतिनिधी

**आज १७ सप्टेंबर महाराष्ट्राच्या बाबतीत या दिवसाला फार काही महत्त्व नसलं तरी मराठवाड्यासाठी हा दिवस फारच महत्त्वाचा आहे १७ सप्टेंबर म्हणजे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन याच मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून बीड जिल्हा वाशियांचे स्वप्न पूर्णत्वास येत आहे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बीडच्या माजी खासदार स्वर्गीय केशर काकू क्षीरसागर माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्यासह अनेकांचे मोठे योगदान आहे ते विसरता येणार नाही आजच्या घडीला हीच मोठी श्रद्धांजली ठरेल मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस उपमुख्यमंत्री चा पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये आज बीड ते पुणे या रेल्वेचा शुभारंभ होत आहे ही बाब बीडकरांसाठी मोठी आनंदाचे आहे.**










बीड जिल्ह्यामध्ये रेल्वे यावी यातून औद्योगिक सामाजिक आर्थिक विकास व्हावा हाच यामागचा उद्देश होता यासाठी स्वर्गीय द्वारकादास मंत्री स्व.अतरबाबर, स्व.सारडाजी ,रेल्वे समितीचे स्व.नामदेवराव क्षीरसागर, स्व.बनसींधर जाधव, स्व. अमोल गल्लधर यांच्यासह अशोक तावरे, जयप्रकाश आगाव, संगमेश्वर आधळकर, चव्हाण, यांच्यासह अनेकांनी मोठे प्रयत्न केले विशेषता स्वर्गीय केशर काकू यांनी सुरुवातीला ही मागणी शासन दरबारी लावून धरली थेट दिल्लीपर्यंत रेल्वेचा आवाज काकूंनी नेला आणि त्याला मूर्त स्वरूप काही कालांतराने आले स्वर्गीय गोपीनाथ मुंडे आणि स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या घनिष्ठ मैत्रीचा लाभ बीडच्या रेल्वे मार्गाकरता झाला हे विसरता कामा नये याच काळामध्ये केंद्राने दिलेली मदत आणि त्यामध्ये राज्य शासनाचा ५०% वाटा ही भूमिका स्व. विलासराव देशमुख यांनी घेतल्यामुळे हा मार्ग अधिकच सोयीस्कर बनायला गेला त्या काळामध्ये बीड जिल्ह्यात मोठी आंदोलने देखील झाली या आंदोलनामध्ये बीड जिल्ह्यातील अनेकांनी हा आपल्या हक्काचा विषय आहे म्हणून स्वतःला यात झोकुन दिले त्या नावाची यादी खूप मोठी आहे परंतु या सर्व प्रक्रियेमध्ये सहभागी असलेले डॉक्टर अरुण भस्मे यांनी स्व.काकू यांनी केलेल्या रेल्वे संदर्भातील कार्याचा आढावा दिला त्यांच्या मते स्व. केशरकाकू क्षीरसागर यांनी या मागणीची मूळ सुरुवात केली. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी आणि राजीव गांधी तसेच नरसिंहराव यांची भेट घेऊन किचकट वाटणाऱ्या या मार्गाला अभ्यासू पद्धतीने मंजुरी मिळवून दिली होती.अहिल्यानगर-बीड-परळी नवीन रेल्वे मार्ग हा सर्वोच्च प्राधान्याने राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांपैकी एक आहे. सर्वात महत्त्वाच्या पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांपैकी एक असलेला हा प्रकल्प आहे. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र जोडणारा हा महत्त्वाचा रेल्वे मार्ग २६१.२५ किलोमीटर लांबीचा आहे. त्यापैकी अहमदनगर ते बीड-वडवणी हे काम जवळपास पूर्ण झाले असून विद्युत जोडणी देखील पूर्ण झाली आहे, पान २ वर

## अग्रलेख

# मोदींची प्रतिमा; ब्रिक्समध्ये भारताची नेमकी उंची किती?

आंतरराष्ट्रीय राजकारणात एखाद्या देशाला मोठ्या परिषदांचे यजमानपद मिळणे ही प्रतिष्ठेची बाब असते. मात्र यजमानपद, राजनैतिक दृश्यमानता आणि प्रत्यक्ष धोरणात्मक प्रभाव या तीन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे दिल्लीतील ब्रिक्स शिखर परिषदेनंतर भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापन करताना उत्सवी प्रतिमा आणि प्रत्यक्ष परिणाम यांच्यात फरक करणे आवश्यक आहे.

१२-१३ सप्टेंबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या १८व्या ब्रिक्स शिखर परिषदेत भारताने अध्यक्षपद भूषवले. ब्रिक्सच्या 'नवी दिल्ली घोषणापत्रा'त भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कामकाजातील प्रगतीचे कौतुक करण्यात आले असून, २०२७च्या अध्यक्षपदासाठी चीनला पाठिंबा देण्यात आला आहे. घोषणापत्रात बहुपक्षीयता, ग्लोबल साउथचा अधिक प्रतिनिधित्वाचा आग्रह, आर्थिक सहकार्य, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक प्रशासनातील सुधारणांवर भर देण्यात आला आहे. यातून भारताच्या अध्यक्षपदाला काही संस्थात्मक परिणाम मिळाले, असे म्हणता येईल. मात्र त्यावरून भारताने ब्रिक्सचा अजेंडा निश्चितपणे आपल्या हातात घेतला, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. याच ठिकाणी नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग यांच्या नेतृत्वशैलीचा प्रश्न उपस्थित होतो. मोदींच्या नेतृत्वाखाली भारताने अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासोबत मध्ये सहकार्य राखतानाच ब्रिक्स आणि सारख्या मंचांवर चीन व रशियासोबत संवाद कायम ठेवला आहे. भारताच्या या भूमिकेला अनेकदा 'रणनीतिक स्वायत्तता' किंवा 'मल्टी-अलाइनमेंट' असे संबोधले जाते. यामुळे भारताला विविध शक्तिकेंद्रांशी स्वतंत्रपणे व्यवहार करण्याची संधी मिळते. पण या धोरणाची खरी कसोटी एकचभारत विविध शक्तिकेंद्रांशी संबंध ठेवतो आहे, हे महत्त्वाचे; पण त्या संबंधांमधून भारताला प्रत्यक्ष धोरणात्मक लाभ किती मिळतो आहे? दुसरीकडे शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने आर्थिक आणि तांत्रिक क्षमतेचा मोठ्या प्रमाणावर परराष्ट्र धोरणाशी संबंध जोडला आहे, हे निर्विवादपणे चर्चेत आहे. मात्र ब्रिक्समधील प्रत्येक घडामोडीला चीनच्या वर्चस्वाचा परिणाम मानणेही तितकेच अचूक ठरणार नाही. ब्रिक्स मध्ये सदस्य देशांचे हितसंबंध परस्परांपासून वेगळे आहेत आणि घोषणापत्रातील अनेक मुद्द्यांवर सहमती निर्माण करण्यासाठी सामूहिक वाटाघाटी आवश्यक असतात. यंदाच्या परिषदेतही ही गुंतागुंत दिसून आली. विस्तारित ब्रिक्समध्ये ११ सदस्य आहेत आणि त्यांच्या आर्थिक, राजनैतिक व प्रादेशिक हितसंबंधांमध्ये मोठी विविधता आहे. त्यामुळे या समूहाला एकसंध राजकीय शक्ती म्हणून पाहण्यापेक्षा विविध देशांना एकत्र आणणारे सहकार्याचे व्यासपीठ म्हणून पाहणे अधिक सावधपणाचे ठरेल. मात्र चीनची भूमिका दुर्लक्षित करूनही चालणार नाही. मोदी आणि शी यांची दिल्लीतील भेट ही सात वर्षांनंतर भारताच्या भूमीवर झालेली पहिली द्विपक्षीय भेट होती. दोन्ही बाजूंनी संबंध सुधारण्याबाबत संवाद वाढवण्याची भूमिका घेतली. मोदींनी सीमाभागातील शांतता आणि स्थैर्याला संबंध सुधारण्याचा आधार मानले, तर दोन्ही देशांनी सीमा प्रश्नावर संवाद सुरू ठेवण्याचे संकेत दिले. ही बाब सकारात्मक संवादाचे संकेत देते; पण सीमा प्रश्न सुटला आहे, असा निष्कर्ष त्यातून काढता येत नाही. याचप्रमाणे चीनशी व्यापार वाढत असल्याचा अर्थ संबंध पूर्णपणे सामान्य झाले, असेही म्हणता येणार नाही. २०२५ मध्ये भारत-चीन द्विपक्षीय व्यापार विक्रमी पातळीवर पोहोचल्याचे ने नमूद केले; त्याच वेळी भारताची चीनसोबतची व्यापारतूट मोठी असल्याचेही वृत्तात नमूद आहे. म्हणून भारतासमोरचा प्रश्न अधिक कठीण आहेचीनशी संवाद आणि आर्थिक संबंध वाढवत असताना भारताने राष्ट्रीय सुरक्षेचे, सीमाविषयक हितांचे आणि व्यापारातील समतोलाचे संरक्षण कसे करायचे? इथे मोदींच्या परराष्ट्र धोरणाची खरी कसोटी आहे. 'ग्लोबल साउथ'चा आवाज बनण्याचा भारताचा प्रयत्न ब्रिक्सच्या घोषणेतही प्रतिबिंबित झाला आहे. घोषणापत्रात विकसनशील देशांना जागतिक निर्णयप्रक्रियेत अधिक प्रतिनिधित्व मिळावे, अशी भूमिका घेण्यात आली आहे. भारताच्या अध्यक्षतेत चारशेपेक्षा अधिक ब्रिक्स बैठका व उपक्रम भारतातील ३० शहरांत झाल्याचेही घोषणापत्रात नमूद आहे. पण येथेही प्रश्न आहेप्रतिनिधित्वाची मागणी आणि प्रत्यक्ष जागतिक प्रभाव यात किती अंतर आहे? भारताची लोकशाही, विशाल बाजारपेठ, तरुण लोकसंख्या आणि वाढती आर्थिक क्षमता या निश्चितच महत्त्वाच्या ताकदी आहेत. परंतु जागतिक प्रभाव मोजताना आर्थिक उत्पादन, तंत्रज्ञान, संशोधन, संरक्षणनिर्मिती, व्यापार, गुंतवणूक आणि पुरवठा साखळ्यांमधील स्थान यांचाही विचार करावा लागतो. म्हणूनच 'मोदींची प्रतिमा, शींची ताकद' हा वाक्प्रचार वापरताना एक सावधगिरी आवश्यक आहे. मोदींची प्रतिमा ही भारतीय परराष्ट्र धोरणातील दृश्यमानतेचा एक भाग असू शकते; पण तिचे स्वतंत्रपणे मोजमाप करणे कठीण आहे. त्याचप्रमाणे शी यांच्या नेतृत्वाखाली चीनचे आर्थिक व तांत्रिक सामर्थ्य मोठे आहे, हे मान्य करतानाही त्या सामर्थ्याचे ब्रिक्समधील प्रत्येक निर्णयावर थेट नियंत्रण आहे, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरेल. खरा मुद्दा त्यामुळे व्यक्तींच्या तुलनेपेक्षा देशांच्या क्षमतेचा आहे. भारत ब्रिक्समध्ये उपस्थित आहे का, की प्रभावीपणे परिणाम घडवतो आहे? चीनशी संवाद साधताना भारत स्वतःचे रणनीतिक हित किती प्रभावीपणे जपतो आहे? ग्लोबल साउथच्या वतीने बोलण्यापलीकडे भारत त्या देशांना कोणते ठोस आर्थिक आणि तांत्रिक पर्याय देऊ शकतो? या प्रश्नांची उत्तरे एका ब्रिक्स परिषदेत मिळणार नाहीत. ती पुढील काही वर्षांच्या धोरणात्मक परिणामांतूनच स्पष्ट होतील. दिल्ली परिषद भारतासाठी राजनैतिक संधी होती. आता तिचे रूपांतर दीर्घकालीन परिणामांत करण्याची जबाबदारी भारताची आहे. २०२७मध्ये ब्रिक्सचे अध्यक्षपद चीनकडे जाणार आहे. त्यामुळे दिल्लीतील प्रकाशझोत संपल्यानंतर खरी परीक्षा सुरू होते. कारण परराष्ट्र धोरणात प्रतिमा महत्त्वाची असते; पण प्रतिमेला आधार देणारी राष्ट्रीय क्षमता त्याहून महत्त्वाची असते. मोदींची प्रतिमा किती मोठी आणि शींची ताकद किती मोठी, यापेक्षा भारताने स्वतःची आर्थिक, तांत्रिक, संरक्षणात्मक आणि राजनैतिक ताकद किती वाढवली, हा प्रश्न पुढील काळात अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. ब्रिक्सच्या आरशात भारताने चीनकडे पाहण्यापेक्षा स्वतःची उंची मोजण्याची हीच वेळ आहे.

---

## लक्ष्मण हाकेंची गोपीचंद पडळकरांवर टीका

सांगली । प्रतिनिधी

**राज्यात एकीकडे मनोज जरांगे यांचे मराठा आरक्षण आणि जात पडताळणी प्रमाणपत्रासंदर्भाने आरक्षण सुरू असून ते सध्या मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. मात्र, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्य सरकार, मुख्यमंत्री आणि मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार टीका केली. ओबीसींचे आरक्षण हिरावून घेतले जात असून, "ओबीसींचे आरक्षण संपले आहे, हा माझा दावा आहे," असे हाके यांनी म्हटले.**

सांगलीत आयोजित पत्रकार परिषदेत लक्ष्मण हाकेंनी जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत भूमिका स्पष्ट केली. मागासवर्गीय समाजातील लोकांचे दाखले काढले गेले असून, ओबीसी समाज असंघटित असल्याने केवळ मतांसाठी त्याचा वापर केला जात असल्याचा आरोप हाके यांनी केला. ओबीसी नेतेही या प्रश्नावर मूग गिळून बसले आहेत. खासदार विशाल पाटील यांनी मराठा आंदोलनाला पाठिंबा देत एकप्रकारे मनोज जरांगे पाटील यांना समर्थन दर्शवल्याचे हाके म्हणाले. मात्र, सध्या मराठा समाजात कोणते आरक्षण स्वीकारायचे, यावरून संभ्रम निर्माण झाला असल्याचा दावाही त्यांनी केला.तसेच भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या भूमिकेवरही हाके यांनी प्रश्न उपस्थित केला. "पडळकर हे सत्ताधारी पक्षाचे आमदार आहेत. सत्ताधारी आमदार आंदोलन कसे करू शकतात? ते मुख्यमंत्र्यांच्या किचन कॅबिनेटमधील आमदार आहेत," अशी टीका त्यांनी केली. धनगर समाजाचा ओबीसी प्रवर्गातील समावेश आणि आरक्षणाच्या प्रश्नावर बोलताना, धनगर समाजाच्या आरक्षणासाठी धनगर समाजानेच भूमिका घेण्याची जबाबदारी आहे. "ओबीसी समाज एकत्र आला, तर अनेकांचे डिपॉझिट जप्त होईल. वेळ पडली तर ओबीसींचा स्वतंत्र पक्ष काढू," असा इशाराही त्यांनी दिला"मंत्र्यांनी जरांगे पाटील यांची वारंवार भेट घेऊन त्यांच्या आंदोलनाचे बळ वाढवले. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री दिशाभूल करत आहेत. मुख्यमंत्र्यांनी ओबीसी आरक्षणाचा जनरल वॉर्ड करून ठेवला आहे," असा आरोप हाके यांनी केला. महाराष्ट्रात संविधानविरोधी भूमिका घेतल्या जात आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर टीका करताना हाके यांनी, "जरांगे, तुमचा लढा मराठा समाजातील गोरगरीब लेकरांसाठी आहे. मात्र, ओबीसींच्या लेकराबाळांचा बळी देऊन तुम्हाला हा लढा जिंकायचा आहे का?" असा सवाल उपस्थित केला.

---

## जिल्ह्यातील शेतकऱ्याचा पिकांच्या परिस्थितीचा संकलित अहवाल शासनास सादर-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

**खरीप हंगाम २०२६ मध्ये पर्जन्यमानातील अनिश्चितता तसेच पावसाच्या खंडाचा पिकांच्या परिस्थितीवर परिणाम झाला आहे. १४ सप्टेंबरअखेर जूनपासून जिल्ह्यात झालेला एकूण पाऊस हा या कालावधीतील सरासरी पर्जन्यमानाच्या केवळ ८१.० टक्के झाला आहे. ऑगस्ट महिन्यातही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला असून, सप्टेंबरमध्ये १४ तारखेपर्यंत सरासरीच्या केवळ ३३.१ टक्के पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील खरीप पिकांच्या परिस्थितीची संयुक्त पाहणी करून जिल्ह्याचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.**

जिल्ह्यात निर्माण झालेल्या संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीची बैठक ११ सप्टेंबर २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीत खरीप हंगामातील पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या पिकांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी संयुक्त पीक पाहणी समित्यांची स्थापना करण्यात आली.



या समित्यांमध्ये उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ व विषयतज्ज्ञांचा समावेश करण्यात आला. या संयुक्त समित्यांनी संबंधित तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष क्षेत्रभेटी करून विविध पिकांची सद्यःस्थिती, पावसातील खंडामुळे पिकांवर झालेला परिणाम, पिकांची वाढ व उत्पादनाची संभाव्य स्थिती आदी बाबींची पाहणी केली. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या संयुक्त पीक पाहणी समित्यांनी आपले अहवाल सादर केले असून, त्याआधारे जिल्ह्याचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. शासन स्तरावर सदर अहवालाची आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शासनामार्फत पुढील उपाययोजना करण्यात येणार आहेत. पिकांची सद्यःस्थिती, उपलब्ध पाणीसाठा, पिकांची अवस्था आणि स्थानिक पर्जन्यमानाचा विचार करून कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार पुढील पीक व्यवस्थापनाचे नियोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. तसेच पीकविषयक कोणताही निर्णय घेताना कृषी विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून व तज्ज्ञांकडून प्राप्त होणाऱ्या सल्ल्याचा अवलंब करावा. जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासन आवश्यक त्या उपाययोजना करीत असून, शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्ती यांनी सांगितले आहे.

---

## एसटी प्रवासात कार्ड सक्तीचा निर्णय पुढे ढकलला

मुंबई । प्रतिनिधी

**एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' कार्ड १ सप्टेंबर २०२६ पासून अनिवार्य केले होते पण आता याबाबत निर्णय घेत या योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. आता कार्डची सक्ती ३० सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात एसटीने प्रवास करणाऱ्या महिला आणि ज्येष्ठांना दिलासा मिळाला आहे.**

शासनाच्या सवलतीचा लाभ घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना 'एनसीएमसी' कार्ड १ सप्टेंबर २०२६ पासून अनिवार्य करण्यात आले होते. शासनाच्या सवलतीचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांना हा निर्णय बंधनकारक करण्यात आला होता. ज्यानंतर अनेक प्रवाशांनी कार्ड घेतले होते. पण हे कार्ड घेताना अनेक प्रवाशांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागले होते.'एनसीएमसी' कार्ड अनिवार्य केल्यानंतर डिजिटल तिकीट प्रणालीवर प्रवाशांचा मोठा भार पडला. त्यामुळे एसटीच्या सर्व्हरवर ताण येऊन वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत होत्या. सर्व्हर सतत डाऊन होणे, तसेच मोठ्या प्रमाणात 'हिट्स' वाढल्याने वाहकांना सवलतीची तिकिटे देताना अडचणी येत होत्या. परिणामी बस स्थानकांवर आणि बसमध्ये प्रवाशांची गैरसोय होत होती. या पार्श्वभूमीवर महामंडळाने कार्ड सक्तीला मुदतवाढ दिली आहे.३० सप्टेंबरपर्यंत महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना पूर्वीप्रमाणे आधार कार्ड किंवा अन्य अधिकृत ओळखपत्र दाखवून सवलतीचे तिकीट घेता येणार आहे. त्यासाठी एनसीएमसी कार्ड असणे बंधनकारक राहणार नाही. महामंडळाच्या वाहतूक विभागाच्या महाव्यवस्थापकांनी परिपत्रक क्रमांक ५५४४ जारी करून याबाबत सूचना दिल्या आहेत.ज्या प्रवाशांकडे आधीपासून सक्रिय एनसीएमसी कार्ड आहे, त्यांना सवलतीच्या तिकिटासाठी त्याच कार्डाचा वापर करता येणार आहे.

---

## यूपीआयवर कर लावून गरिबांची लूट;विजय वडेट्टीवार

नागपूर । प्रतिनिधी

केंद्रातील मोदी सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे दोलायमान झाली असून देश कर्जाच्या खाईत लोटला गेला आहे, असा घणाघाती आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी 'यूपीआय'वरील शुल्क म्हणजे सामान्य जनतेची उघड लूट असल्याचे म्हटले आहे.

कॅशलेस व्यवहारांवर आकारल्या जाणाऱ्या शुल्काचे गणित मांडताना वडेट्टीवार म्हणाले, यूपीआयच्या माध्यमातून २,००० रुपयांच्या व्यवहारावर १२ रुपये आकारले जात आहेत, म्हणजेच सुमारे ०.४ टक्के शुल्क बँकांच्या खात्यात जमा होत आहे. जर एखाद्या व्यापाऱ्याचे १ लाख रुपयांचे व्यवहार झाले, तर त्यावर ६०० रुपये सरकार वसूल करेल. व्यापारी हा भुर्दंड स्वत: सोसणार नसून शेवटी तो ग्राहकांकडूनच वसूल केला जाईल. ग्राहक आणि व्यापारी यांच्यातील दैनंदिन खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून अशा प्रकारे वसुली करण्याचा अधिकार सरकारला कोणी दिला? सरकार केवळ गरिबांना लुटून उद्योगपतींचे खिसे भरण्याचे काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला.देशातील बँकिंग क्षेत्राच्या स्थितीवर चिंता व्यक्त करताना त्यांनी केंद्रावर ताशेरे ओढले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या मोजक्या उद्योगपती मित्रांना पोसण्याचे काम करत आहेत. १६ लाख कोटी रुपयांची महाकाय कर्जमाफी देताना सरकारने सामान्य करदात्याचा कोणताही विचार केला नाही. बँकांचे प्रचंड भांडवल एकाच उद्योग समूहाकडे वळवले जात असून, जर अदानींचा डोलारा खचला तर संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होईल आणि बँका बुडीत निघतील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. आज बँकांची आर्थिक स्थिती इतकी कमकुवत झाली आहे की, भविष्यात सामान्य माणसाला स्वत:चे पैसे काढणेही अवघड होईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

---

## पान १ वरून...

### मराठवाड्यात

प्रशासनाच्या निरीक्षणात नमूद करण्यात आले आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत मराठवाड्यात आतापर्यंत सुमारे ६८ टक्के पाऊस झाला आहे. विभागासाठी अपेक्षित पर्जन्यमान ५९१ मिमी असताना प्रत्यक्षात सुमारे ४०५.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. म्हणजेच अपेक्षित पावसाच्या तुलनेत सुमारे ३१ टक्के तूट आहे. जिल्हानिहाय स्थिती पाहता छत्रपती संभाजीनगरमध्ये ८३ टक्के, जालन्यात ८०, नांदेडमध्ये ७७, हिंगोलीत ७०, बीडमध्ये ६४, धाराशिवमध्ये ६१, परभणीत ५५, तर लातूरमध्ये केवळ ५२ टक्के पाऊस झाला आहे. पावसाची एकूण आकडेवारी कमी असण्याबरोबरच पावसातील दीर्घ खंड हा मराठवाड्यासाठी गंभीर चिंतेचा विषय ठरत आहे. बीड आणि जालना जिल्ह्यांतील अनेक भागांत तब्बल ४२ दिवसांपेक्षा अधिक काळ पाऊस झालेला नाही. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही २१ दिवसांपेक्षा अधिक पावसाचा खंड असलेल्या मंडळांची संख्या मोठी आहे. पावसातील या दीर्घ खंडाचा थेट परिणाम खरीप पिकांवर होत आहे. उशिरा झालेल्या पावसानंतर पुन्हा पावसाने दडी मारल्याने पिकांची वाढ खुंटणे, पिके कोमेजणे आणि उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कमी पाऊस आणि मोठा खंड असलेल्या भागांमध्ये शेतकऱ्यांना उपलब्ध पाण्याच्या आधारे पिके वाचविण्याची धडपड करावी लागत आहे.

---------------

### पाटोद्यात जरांगे पाटलावर उपचार

सांगितले. पाटोद्यात डॉक्टरांनी मनोज जरांगे यांची तपासणी केली. उपचार न घेतल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते, असे डॉक्टरांनी म्हटले. आम्ही उपचार घेण्याची विनंती केली. पण मनोज जरांगे ऐकायला तयार नाहीत. मनोज जरांगे यांनी उपचार घ्यायला हवेत, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीश सोळंके यांनी म्हटले. मनोज जरांगे यांची प्रकृती आम्ही तपासली. त्यांचा रक्तदाब आणि शुगरची पातळी खालवाली आहे. आम्ही आता जरांगेंना सलाईन लावली आहे. शरीरात आणखी डिडायड्रेशन झाले तर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यांचा युरिन रिपोर्ट पाहून पुढचा निर्णय घेतला जाईल. त्यांना रुग्णालयात दाखल करण्याची गरज आहे. आम्ही त्यांना विनंती करुन बघू. त्यांना फक्त सलाईन लावून मुंबईपर्यंत जाता येणार नाही. ते गंभीर डिहायड्रेशनच्या लेव्हलच्या जवळ पोहोचले होते, असेही डॉक्टरांनी सांगितले.मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे यांच्या आझाद मैदानातील उपोषणाला परवानगी नाकारली आहे. आतापर्यंत मुंबई पोलिसांनी जरांगे यांचे दोन अर्ज फेटाळले आहे. मनोज जरांगे यांनी तिसऱ्यांदा अर्ज केला असून ते उच्च न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत. दरम्यान, आझाद मैदानात आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांची माहिती पोलिसांनी मागितल्याचे समजते. जे ५० आंदोलक आंदोलन करणार आहे त्यांचे मोबाईल नंबर आणि डिटेल्स पोलिसांनी मागवले आहेत. सोबतच कोणत्या वाहनातून येणार आहे त्या वाहनांचा तपशीलही पोलिसांनी मागितला आहे. आंदोलनाला कोण पन्नास लोक असणार हे मनोज जरांगे पाटील ठरवणार. तबियत ठीक नसतानाही त्यांनी माध्यमांना सांगताना आपण उद्या दुपारी मुंबईकडे निघणार आहोत त्यासोबतच या दरम्यानचे कार्यक्रम रद्द होणार असून इतर समाज बांधवाना कधी मुंबईत यायचं ते लवकरच कळवले जाईल असे सांगण्यात आले.

-------------

### शिवसेना नेमकी कोणाची

असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला. पक्षातील अंतर्गत लोकशाहीचा प्रश्न महत्त्वाचा आहे, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला.पक्षाला चांगल्या उत्तरदायित्वाची अपेक्षा आहे. उद्धव ठाकरेंच्या वेळी ही अपेक्षा पूर्ण झाली नसल्याचं दिसून येतं. ठाकरेंनी पक्षाला स्वत:च्या वैयक्तिक व्यवस्थेप्रमाणे वापरण्याचा प्रयत्न केला, असा युक्तिवाद कौल यांनी केला. तसेच कार्यकर्त्याला पक्षात काय सुरु आहे यावर बोलण्याचा अधिकार आहे. तसेच पक्ष संघटना कशी चालावी यावर बोलण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला.

--------- ------------

### शिक्षण विभागातच अवतरले

सर्वोच्च भाषा बोलून आपले चारित्र्य जगजाहीर करून दाखवले या दारुड्या शिक्षकाला यापूर्वी निलंबित देखील करण्यात आले होते अशी माहिती आहे त्याबरोबरच त्याला आता प्रतिनिधी वर एका शाळेवर पाठवल्या देखील आहेत मात्र तो शाळेत ज्ञानार्जन करण्याऐवजी जिल्हा परिषदेच्या आवारात येऊन कर्मचाऱ्यांनाच धडे देताना दिसत आहेत अशा शिक्षकामुळे आणि शिक्षका पेशामुळे सर्वच क्षेत्राची बदनामी होताना दिसते हा जर कार्यालयात दारू पिऊन येत असेल तर शाळेवर कशा अवस्थेत जात असेल याचा विचार न केलेला बरा आता या शिक्षकावर कारवाई कोण करणार असा देखील मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

-------------

### तुकाराम मुंढेंनी रूग्णालयाच्या

असू शकते. महाराष्ट्र एफडीएच्या सर्वेक्षणाच्या आधारे, औषधनिर्माण विभाग आणि एनपीपीएने या विसंगतीबाबत पुनरावलोकनाची शिफारस केली आहे.अहवालानुसार, एनपीपीए वैद्यकीय उत्पादन उत्पादक आणि मध्यस्थांकडून जोडल्या जाणाऱ्या नफ्याच्या मार्जिनची चौकशी करत आहे. यासाठी, कंपन्यांची कागदपत्रे आणि किंमत सूची यांची महाराष्ट्र एफडीएच्या सर्वेक्षण डेटाशी तुलना केली जात आहे. पंजाब, राजस्थान आणि तामिळनाडू येथूनही अशाच प्रकारच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत.रुग्णालयांचे म्हणणे आहे की, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आवश्यक असले तरी, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि रुग्ण सुरक्षेवरील त्यांच्या खर्चाचाही विचार केला पाहिजे. रुग्णालयांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम राहणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून ते आवश्यक गुंतवणूक करणे सुरू ठेवू शकतील.औषध (किंमत नियंत्रण) आदेश, २०१३ नुसार, अनेक अत्यावश्यक औषधांवर किंमत मर्यादा लादण्यात आल्या असल्या तरी, त्या बहुतेक वैद्यकीय उपकरणे आणि उपभोग्य वस्तूंना लागू होत नाहीत. असूचीबद्ध उत्पादनांची कमाल किरकोळ किंमत १२ महिन्यांत जास्तीत जास्त १० टक्क्यांनी वाढवता येते, परंतु याचा अर्थ असा नाही की प्रत्येक वैद्यकीय उपकरणावर एक निश्चित किंमत मर्यादा आहे.सरकारने यापूर्वी कोरोनरी स्टेंट आणि नी इम्प्लांट्ससारख्या काही वैद्यकीय उत्पादनांच्या किमती नियंत्रित केल्या आहेत. कोविड-१९ महामारीच्या काळात, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरसह काही अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांवरील व्यापारी नफ्याचे प्रमाण (ट्रेड मार्जिन) देखील नियंत्रित करण्यात आले होते. आता अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणे आणि उपभोग्य वस्तूंसाठी व्यापारी नफ्याचे प्रमाण नियंत्रित करणे, किमतींवर देखरेख वाढवणे किंवा किंमत मर्यादा लादणे यांसारख्या पर्यायांचा विचार केला जात आहे.

---------------

### पुण्यात मुख्यमंत्र्यांना

जात मुख्यमंत्र्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच मुख्यमंत्र्यांना घेराव घालण्याचा प्रयत्नही यावेळी करण्यात आला. पोलिसांनी हस्तक्षेप करत मराठा आंदोलकांना सुरुवातीली समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलकांची घोषणाबाजी सुरूच असल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. मराठा आरक्षणाच्या लढ्याची धग मुंबईच्या दिशेने वाढत आहे, पण या आंदोलनाचं नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांचंच शरीर आता होरपळून निघत आहे. १९ दिवसांचं उपोषण... हजारोंचा जनसमुदाय... आणि आरक्षणासाठी मुंबई गाठण्याचा निर्धार... पण पाटोद्यात पोहोचलेल्या जरांगेंची प्रकृती खालावली आहे. डॉक्टरांनी तपासणी केली, सलाईन लावलं. 'शरीरापेक्षा दौरा महत्त्वाचा नाही. दौरा रद्द करावा लागेल. माझ्या जागेवर कोणीही असू द्या, समाजासाठी एक बळी जाऊ द्या', असं मनोज जरांगे म्हणाले. जरांगेंच्या या शब्दांनी आंदोलनाचा संघर्ष किती टोकाला पोहोचला आहे, याची जाणीव होते.

--------------

### रेल्वे मार्गाची पूर्तता म्हणजे स्व.काकू,

दि १७ सप्टेंबर २०२६ रोजी नगर ते बीडपर्यंत रेल्वेमार्गाचे काम पूर्ण झाल्याने बीड-पुणे या मार्गावरची रेल्वे धावणार आहे त्यामुळे मराठवाड्यातील प्रवाशांचा प्रवास सोपा आणि सुखकर होणार आहे.या रेल्वे मार्गासाठी कोणत्या काळात कुणी कोणते काम केले हेही नवीन पिढीला माहीत होणे गरजेचे आहे,मुळातच तत्कालीन खा केशरकाकू क्षीरसागर यांनी केलेला प्रयत्नांना खरे स्वरूप आले आहे स्व काकूंचा पाठपुरावा आणि माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केलेली अर्धा वाटा राज्य सरकारने उचलण्याची महत्वाची मागणी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे केली व त्यांनी मंजूर केली आणि आजतागायत सुरू राहिली म्हणूनच हा रेल्वे मार्ग आज पूर्ण होताना आपण बघत आहोत यासाठी अनेकांनी योगदान दिले आहे ते नाकारता येत नसले तरी खरी माहिती देखील दृष्टीआड करता येणार नाही,बीडचे नगराध्यक्ष डॉ भारतभूषण क्षीरसागर,जेष्ठ संपादक स्व नामदेवराव क्षीरसागर,स्वातंत्र्य सैनिक स्व बन्सीधरराव जाधव,स्व हिरालाल सारडा,स्व मदनलाल सारडा,जेष्ठ उद्योजक सत्यनारायण लाहोटी, जेष्ठ नेत्या सुशीला मोराळे,स्व अमोल गलधर,गिरीश देशपांडे,अशा अनेक लोकांचा सहभाग या मागणीसाठी होता. अहिल्यानगर-बीड-परळी हा रेल्वेमार्ग जिल्ह्यासाठी महत्त्वाचा विकास प्रकल्प आहे.त्यावेळी खा. केशरकाकू क्षीरसागर यांनी तत्कालीन तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांना भेटून १९९५ मध्ये तांत्रिक मान्यता देऊन हा रेल्वेमार्ग मंजूर करण्यात आला. या २६१ किलोमीटरच्या मार्गाला सुरूवातीला केवळ ३५३ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता.पुढे यासाठी ४४५० कोटींचा निधी प्रस्तावित झाला,यासाठी केंद्राकडून इतका निधी एकाच वेळी मिळणे शक्य नव्हते या साठी लागणाऱ्या निधीची तरतूद केंद्र व राज्य सरकार संयुक्तपणे करावा अशी आग्रही मागणी तत्कालीन मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मंत्रिमंडळ बैठकीत केली आणि मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनीही हिरवा कंदील दिला आणि खऱ्या अर्थाने या मार्गाला गती मिळाली. बीड जिल्ह्यातील विकासाच्या संदर्भात स्व काकूंनी स्वतः प्रयत्न करत असताना रेल्वे मार्ग आणि दूरदर्शन या दोन प्रमुख मागण्यासाठी बीड जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक व लोकप्रतिनिधीचे शिष्टमंडळ घेऊन तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी,राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग,डॉ.शंकर दयाळ शर्मा यांची भेट घेऊन या दोन आग्रही मागण्या मांडून चर्चा केली होती सर्वात प्रथम रेल्वे संदर्भात १९८० साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग, डॉ शंकर दयाल शर्मा आणि तत्कालीन रेल्वेमंत्री गणी खान चौधरी ,जाफर शरीफ, माधवराव शिंदे यांना भेटून स्व.काकूंनी बीड जिल्ह्याच्या या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले होते,यावेळी रेल्वे खात्याने आर्थिकदृष्ट्या हा रेल्वे परवडणारा नसल्याचे कळवले होते तेव्हा स्व काकूंनी बीड जिल्ह्याचा विकास करायचा असेल तर हा न परवडणारा मार्ग करणे आवश्यक असल्याचे म्हटले तेव्हा या संदर्भात स्व इंदिरा गांधी यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त करून सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या होत्या परंतु १९८४ साली ऑक्टोबर महिन्यात इंदिरा गांधी यांची हत्या झाली, स्व.राजीव गांधी पंतप्रधान झाले त्यानंतर १९८५ ला देशात निवडणुका लागल्या आणि स्वर्गीय राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले तेव्हा स्वर्गीय काकूंनी स्व.राजीव गांधी यांच्याकडे सातत्याने रेल्वे संदर्भात पाठपुरावा केल्यानंतर नगर बीड परळी रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण सुरू झाले १९८९-९० साली देशात सार्वत्रिक निवडणूक झाली या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला होता,तेव्हा या मागणीला खंड पडला,स्वर्गीय काकूंचा पराभव झालेला असतानाही त्यांनी या मागणीचा पाठपुरावा सोडला नाही,१९९१ साली पुन्हा देशात लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या काँग्रेस पक्ष स्वर्गीय राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढत होता प्रचारादरम्यान स्व.राजीव गांधी यांची हत्या झाली तेव्हा स्व.केशर काकू बीडमधून निवडून आल्या होत्या त्यावेळी देशाचे पंतप्रधान म्हणून स्व नरसिंहराव हे पंतप्रधान झाले त्या काळात रेल्वे राज्यमंत्री म्हणून सुरेश कलमाडी हे होते या काळात स्व.केशर काकू क्षीरसागर यांनी प्रयत्नांची शिकस्त करून स्व.नरसिंहराव यांच्याकडे आग्रही भूमिका मांडली आणि मंजुरीही करून घेतली तेव्हाच तत्कालीन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी रेल्वे बजेट मध्ये बीडसाठी निधीची घोषणा करून ती मंजूर केली आणि पुढच्या कामाला सुरुवात देखील झाली १९८० च्या पहिल्या निवडणुकीपासून मी बीड जिल्ह्यातील जनतेला रेल्वेचे आश्वासन दिले आहे स्वर्गीय इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी आश्वासन दिले होते परंतु ते दुर्दैवाने आता नाहीत तेव्हा माझा हा प्रश्न निकाली काढावा अशी कळकळीची विनंती स्वर्गीय केशर काकू यांनी नरसिंहराव यांच्याकडे केली केली होती त्याचवेळी नरसिंहराव यांनी या रेल्वे मार्गाला हिरवा कंदील दाखवत मंजुरी देऊन टाकली प्रणव मुखर्जी त्यानंतर चंपावती क्रीडा मंडळाच्या मैदानावर या रेल्वे मार्गाचे भूमिपूजन तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री सुरेश कलमाडी यांच्या हस्ते भूमिपूजन झाले राज्य सरकारचा ५० टक्के वाटा दिल्यास हा रेल्वे मार्ग होऊ शकतो असा प्रस्ताव मांडला विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने ती मागणी मंजूर झाली आणि ती आजतागायत पुढेही चालू आहे,यामुळेच राज्य सरकारचा पन्नास टक्के वाटा या मार्गाला मिळत राहिला आणि या मार्गाचे काम पुढे होत गेले,या रेल्वे मार्गाच्या निधीसाठी वारंवार पाठपुरावा करत प्रत्येक सरकारच्या काळात रेल्वे मंत्र्यांना भेटून वाढीव निधीसाठी प्रयत्न करत राहिल्या,तत्कालीन मंत्री सुरेश कलमाडी, लालू प्रसाद यादव,डॉ.जाफर शरीफ,सुरेश प्रभू ही नेते मंडळी स्व काकूंची भेट होताच बीडच्या रेल्वेबाबत चर्चा करत असत म्हणजे जोपर्यंत काकू खासदार होत्या तोपर्यंत बीड रेल्वे साठीची त्यांची तळमळ लक्षात घेत होतेआता दि १७ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर बीड-पुणे हा रेल्वे प्रवास सुरु होणे असा आहे या आनंदाच्या क्षणी स्व. काकू स्वर्गीय विलासराव देशमुख स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे स्व मुंदडा यांच्यासह रेल्वे मागणी आंदोलन कृती समिती याशिवाय अन्य सामाजिक कार्यकर्ते यांचे देखील या यशामध्ये मोठा वाटा आहे तेव्हा त्यांचे स्मरण होणे ही काळाची गरज म्हणावी लागेल

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १७ सप्टेंबर २०२६
३

## थोडक्यात

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुर्डी (बु.) व्यवस्थापन समितीची निवड

जातेगाव प्रतिनीधी गेवराई तालुक्यातील सुर्डी बुद्रुक सन २०२६-२७ ची नवनिर्वाचित शालेय व्यवस्थापन समिति ची निवड प्रक्रिया पार पडली यावेळी सर्व पालक वर्गातुन सदस्य निवड करण्यात आले व सदूस्य मधुन अध्यक्ष व उपाध्यक्ष ची निवड प्रक्रिया पार पडली यावेळी

श्री. अशोक सयाजी सोळुंके अध्यक्ष सौ. वर्षा राधाकिसन सपकाळ सदस्य सौ. छाया ज्ञानदेव धांडे उपाध्यक्ष कु.सोनाली तुकाराम पागेगुडे सदस्य श्री. दत्ता रावसाहेब सोळुंके सदस्य सौ. शोभा शरद गाडे ,श्री. हनुमान शिवराम बोबडे सदस्य, सुश्री शारदा नामदेव तावले सदस्य श्री भीमा (बापू महाराज) उत्तम सोळुंके सदस्य श्री. रामेश्वर दत्ता धांडे शिक्षण प्रेमी श्री. अभिमान राजाभाऊ पेजगुडे श्री रघुनाथ जगन्नाथ माचले शिक्षक प्रतिनिधी. श्री. अंबादास नारायण थडके सुश्री स्वाती गजानन तावले श्री राजेंद्र अर्जुन पवार, सचिव राजेंद्र पवार नवनियुक्त शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा सर्व सदस्यांचे मनपुर्वक अभिनंदन सर्व ग्रामस्थानी पुढील कार्यास शुभेच्छा दील्या यावेळी ग्रामस्थ विद्यार्थी पालक व शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंद उपस्थित होते

### श्री बालाजी सेवा संस्थानच्या नूतन कार्यकारिणीची निवड

माजलगाव : श्री बालाजी सेवा संस्थान, माजलगावच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या सामाजिक, धार्मिक व सेवाभावी कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.




नूतन कार्यकारिणीत अध्यक्षपदी श्री. सुनील मालाणी, उपाध्यक्षपदी श्री. नितीन मुंदडा व श्री. डॉ. संजय जेथलिया, सचिवपदी श्री. पुरुषोत्तम (राजू) मुंदडा, तर कोषाध्यक्षपदी श्री. श्रीकिशन कालिया यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य : श्री. शिवप्रसाद भूतडा, श्री. लक्ष्मीकांत मानधने, श्री. मनोज झंवर, श्री. सुनील भूतडा, श्री. राम जगताप, श्री. नरेश बजाज, श्री. डॉ. महेश मालपाणी आणि श्री. संतोष मुगदिया यांचा समावेश आहे. नूतन कार्यकारिणीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी कार्याला नवी दिशा व गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या समृती दिनाचे भारतीय बौद्ध महासभेकडून आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी



विश्वरत्न बोधिसत्व भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार भारत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र सूर्यपुत्र भैय्यासाहेब तथा यशवंत भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या वतीने आयोजन करण्यात आलेले आहे दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प या ठिकाणी होणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून चैत्यभूमी मुंबई चे पूज्य भंते धम्ममित्र थेरो हे मार्गदर्शन करणार आहे तर माधव काळे मधुकर कदम अरुण पटेकर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारती बौद्ध महासभेचे माजलगाव तालुका अध्यक्ष डॉक्टर भागवत साळवे हे भूषविणार आहेत व प्रवचनाचा विषय आहे )सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांचा समृतीदिन) हो नागरिक धम्मपाल व पेरियार रामास्वामी यांची जयंती व त्यांचे महान कार्य १७ सप्टेंबर २०२० रोजी दुपारी एक वाजता होणाऱ्या या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून कमलताई डोंगरे,लीलाताई उजगरे, आशाताई मोरे एन.बी. राजभोज, बी.सी. डोंगरे, शारदाताई तांगडे, मंदाताई साळवे मायाताई स्वामी,प्रा. एल.आर.मस्के, या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव चे गुलाबराव धाईजे, डी.एस. साळवे ,कोमल डोंगरे, अनुराधा साळवे यांनी केले आहे.

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/५९८
दिनांक :- ३१/०८/२०२६

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) शेख सोएब मुसा मणियार शेख मतिन सिटी सर्व्हे नं. ११९६ नं.प.घर. न.८-११० चे हस्तांतर करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (८-११०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- इब्राहिम रहेमान मणियार यांनी आज रोजी खरेदी केलेली सहन जागा
पश्चिम : सुरैय्या मोबिन पठाण यांचे राहते घर
दक्षिण- ५ फुटाचा सामायीक गल्ली
उत्तरः शेख सोहील शेख मतीन यांनी आज रोजी खरेदी केलेली सहन जागा

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/५९६
दिनांक :- ३१/०८/२०२६

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) इब्राहिम रहेमान मणियार सिटी सर्व्हे नं. ११९६ नं.प.घर. न.८-११० चे हस्तांतर करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (८-११०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- शेख आय्युब यांची सहन जागा
पश्चिम : शेख सोएब मुसा मणियार यांनी आज रोजी खरेदी केलेली सहन जागा
दक्षिण- ५ फुटाचा सामायीक गल्ली
उत्तरः शेख सोहील शेख मतीन यांनी आज रोजी खरेदी केलेली सहन जागा

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/५९७
दिनांक :- ३१/०८/२०२६

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) शेख सोहील शेख मतिन सिटी सर्व्हे नं. ११९६ नं.प.घर. न.८-११० चे हस्तांतर करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (८-११०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- सरकारी रस्ता
पश्चिम : सुरैय्या मोबिन पठाण यांचे राहते घर
दक्षिण- शेख सोएब मुसा मनियार यांनी आज रोजी खरेदी केलेली सहन जागा
उत्तरः शेख मस्तानभाई यांचे राहते घर

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

# दुष्काळजन्य परिस्थितीवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकऱ्यांनी आडविला राष्ट्रीय महामार्ग

बर्दापूर । प्रतिनिधी

राज्यांमध्ये पावसाने मोठा खंड निर्माण झाल्याने शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणपणामुळे हातचा गेला आहे त्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ बी वरील लातूर आंबेजोगाई या महामार्गावरील बर्दापूर फाटा येथे दिनांक १६ सप्टेंबर २०२६ बुधवार रोजी सकाळी ठीक दहा वाजता शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले असून यावेळी असंख्य शेतकरी उपस्थित होते.

अस्मानी संकटा सोबतच महाराष्ट्र शासन व केंद्र शासन हे सुलतानी असल्यासारखे वागत असल्याचे प्रतिपादन शेतकरी नेते अजय बुरांडे यांनी व्यक्त केले आहे शेतकऱ्यांना एकीकडे दुष्काळाच्या झाला सहन कराव्या लागत असतानाच शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी हा सतत भरडला जात आहे शेतकऱ्या सोबतच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न व शासनाचे व विमा कंपन्यांचे साठे लोटे आहे की काय असा समज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पडलेला आहे. राज्यामध्ये व मराठवाड्यामध्ये पावसाचा मोठा खंड निर्माण झाला आहे त्यामुळे शेतकऱ्यावर उपासमारीसह आर्थिक नियोजन पूर्णतः कुल मोडून गेल्याचे दिसून येत आहे त्या अनुषंगाने शासनाने मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हेक्टरी सतरा



हजार पाचशे रुपये मदत जाहीर केली होती त्या अतिवृष्टीची रक्कम शेतकऱ्यांना न मिळाल्याने शेतकरी चिंतेत असतानाच यावर्षी २०२६ मध्ये मोजक्याच पावसावर शेतकऱ्यांनी पेरणी करून लाखो रुपयांचा खर्च करून काळा आईची ओटी भरली होती पण या काळ्या आईने शेतकऱ्यांना भरभरून देण्याचा प्रयत्न केला असताना ऑगस्ट आणि सप्टेंबर मध्ये पावसाचा मोठा खंड पडल्याने हाता तोंडाशी आलेले पिके ही करपून गेली आहेत तर जनावरांच्या चाऱ्याचा ही प्रश्न गंभीर बनला आहे या धर्तीवर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी बर्दापूर फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.त्यात विशेष मागणी म्हणजे २०२६ मध्ये कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी साठ हजार रुपयाची आर्थिक मदत देण्यात यावी,चालू वर्षातील २०२६ चा पिक विमा अग्रीम हप्ता तात्काळ शेतकऱ्यांना देण्यात यावा, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला असून जनावरांसाठी तात्काळ छावण्या सुरू करण्यात याव्यात तसेच शेतमजुरांना तात्काळ रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत या या मागणीचे निवेदन तहसील कार्यालयातील बर्दापूर महसूल आणि अधिकारी कोदरकर यांनी स्वीकारले असून बर्दापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे यावेळी उपस्थित होते यावेळी बर्दापूर फाटा येथे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या या आंदोलनात शेतकरी नेते अजय बुरांडे व जिल्हा परिषद माजी सदस्य अविनाश मोरे जि. प. सदस्य संजय गिराम,धनाजी मदने,शिवाजी बप्पा मोरे,सुरेश घोडके,मक्तार मणियार,वैजनाथ मोरे,गोविंद मोरे,शाहेद भाई,डिगांबर तात्या चव्हाण,वसंत शिंदे विलासराव देशमुख,सलिम भाई,निलेश धुमाळ,विलास धुमाळ,श्रीमंत यादव,भगवान वांगे,काशिनाथ यादव,बालाजी चव्हाण,संतोष पाटिल,बळी काका,बालासाहेब शिंदे,नाना यादव,दिलिप धुमाळ,हनुमंत धुमाळ,श्रीहरी यादव,गणेश माने,भगवान नेमाने सोबतच असंख्य शेतकरी बांधव उपस्थित होते.

# वर्षावासातून ज्ञान आणि प्रबोधनाची वाटचाल

## माजलगावात 'मिलिंद प्रश्न'च्या माध्यमातून धम्मचिंतनाचा जागर

माजलगाव । प्रतिनिधी

वर्षावास म्हणजे धम्मश्रवण, चिंतन, मनन आणि चित्तशुद्धीचा पावन काळ. याच धम्मदृष्टीतून त्रिरत्न बौद्ध महासंघ, माजलगाव यांच्या वतीने स्वामी विवेकानंद नगर, मंजरथ रोड येथील कौशांबी निवास येथे 'मिलिंद प्रश्न' या ग्रंथाचे नियमित सामूहिक वाचन सुरू आहे. कौशांबी निवासात वर्षावासानिमित्त ग्रंथवाचनाचा हा उपक्रम यंदा तिसरे वर्ष पूर्ण करीत असून, सातत्याने सुरू असलेली ही धम्म-अध्ययनाची परंपरा माजलगावच्या बौद्ध सांस्कृतिक जीवनात एक विधायक आणि प्रेरणादायी उपक्रम म्हणून आकार घेत आहे.

धम्मचारी अमोलरत्न, धम्मचारी मंजूरक्षित यांच्या मार्गदर्शनातून राजा मिलिंद आणि भंते नागसेन यांच्यातील प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून बुद्धधम्मातील तत्त्वज्ञान, प्रज्ञा आणि सम्यक दृष्टीचे चिंतन केले जात आहे. मिलिंद प्रश्नच्या



संवादातून तर्क, चिकित्सक विचार आणि धम्मान्वेषणाची परंपरा उलगडत असून बुद्धकालीन संस्कृती, जीवनदृष्टी आणि धम्मदर्शनाची सखोल ओळख होत आहे.

ग्रंथवाचनासोबतच मागील सुमारे ४५ दिवसांपासून दररोज सकाळी ४० मिनिटे आनापानसती ध्यान आणि सायंकाळी २५ मिनिटे मैत्रीभावना साधना नियमितपणे घेतली जात आहे.सम्पूर्ण पूजा बुद्धवंदना, पाली गाथा सूत्रसंगायन तसेच विविध बौद्धिक व सांस्कृतिक प्रबोधनपर कार्यक्रमांमुळे वर्षावासाचे वातावरण अधिक धम्ममय झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या २२ प्रतिज्ञा आणि बोधिसत्त्वांच्या प्रतिज्ञांबाबत जागर निर्माण करण्यासोबतच बौद्ध युवकांना रोजगार, स्पर्धा परीक्षा व रोजगारविषयक माहिती देण्याचे कार्यही केले जात आहे. त्यामुळे धम्मसाधनेसह शील, समाधी आणि प्रज्ञेच्या आधारे धम्माचरण, प्रज्ञावर्धन आणि समाजहिताची भावना दृढ करण्याचा विधायक प्रयत्न या उपक्रमातून होत आहे.

या धम्मवाचन, ध्यान आणि प्रबोधनाच्या उपक्रमात धम्ममित्र लक्ष्मण सहजराव, नवनाथ शिनगारे, भीमराव ठाकरे, अरुण नाकलगावकर, दीपककुमार भालेराव, सुरेखाताई डोंगरे, वंदनाताई शिनगारे, वंदनाताई नाकलगावकर, पुष्पाताई रणदिवे यांच्यासह त्रिरत्न बौद्ध महासंघ, माजलगावमधील सर्व धम्ममित्र बंधू-भगिनींचा सक्रिय सहभाग आहे. तसेच धम्मसहाय्यक उपासिका आशाताई सिरसट, प्रा. वत्सलाताई भिसे आणि नालंदा चांदमारे यांचे या धम्मकार्याला मोलाचे सहकार्य लाभत आहे.

ग्रंथातून धम्मबोध, ध्यानातून चित्तशुद्धी, प्रज्ञेतून सम्यक दृष्टी आणि आचरणातून धम्मपरिवर्तन-अशी वर्षावासाची ही वाटचाल माजलगावच्या बौद्ध सांस्कृतिक जीवनासाठी प्रेरणादायी ठरत आहे. बुद्धधम्म हा केवळ वाचन आणि श्रवणाचा विषय न राहता, २२ प्रतिज्ञा व बोधिसत्त्वांच्या प्रतिज्ञांतील मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणून समतामूलक, विवेकनिष्ठ आणि करुणामय बौद्ध जीवनपद्धतीचा प्रतिज्ञाबद्ध सराव करण्याचा प्रयत्न या वर्षावासातून केला जात आहे.

# पदवीपेक्षा ज्ञान महत्त्वाचे; तरुणांनी आपली क्षमता ओळखावी

## सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेच्या द्वितीय पुष्प गुंफताना डॉ. ललित अधाने यांचे प्रतिपादन

माजलगाव । प्रतिनिधी

माणसाची ओळख केवळ पदवीमुळे होत नाही तर त्याच्या ज्ञानामुळे होते. तारुण्य हे वयावर ठरत नसून मानसिकतेवर ठरते. वास्तवाचे भान असणारा आणि सकारात्मक विचार करणारा तरुणच खऱ्या अर्थाने समाजाच्या परिवर्तनात योगदान देऊ शकतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी व साहित्यिक प्रा. डॉ. ललित अधाने यांनी केले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेच्या द्वितीय पुष्पात डॉ. आधाने प्रमुखमार्गदर्शक म्हणून उपस्थित होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी




प्राचार्य डॉ. अभय सोळुंके होते.यावेळी उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, मराठी विभाग प्रमुख डॉ. भाऊसाहेब राठोड, पर्यवेक्षक महादेव अलझेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढं बोलताना डॉ. अधाने म्हणाले की, आज गुणवत्ता असूनही अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. शासनकर्त्यांची अनास्था, बेरोजगारी आणि भवितव्याची चिंता यामुळे तरुणांच्या मनात खदखद निर्माण झाली आहे. या अस्वस्थतेला योग्य दिशा देणे ही समाजाची जबाबदारी आहे. प्रत्येक तरुणाने स्वतःच्या क्षमता ओळखून त्यांचा योग्य उपयोग केला पाहिजे.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. अभय सोळुंके म्हणाले की, तरुणांनी भविष्याचा वेध घेऊन कालानुरूप कौशल्य आत्मसात करावीत व सतत सकारात्मक दृष्टिकोन अंगिकारावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. डॉ. एम. ए. कव्हळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले, तर आभार प्रा. बापूराव वऱ्हाडे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## जाहीर प्रगटन

३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अंबड जि. जालना यांचे न्यायालय,
(न्यायाधीश एस.एच. राठी मॅडम यांचे समोर)
दिवाणी किरकोळ अर्ज क २२१/२०२६ सुनिता व ईतर विरूध्द निरंक
पुढील तारीख २३/१०/२०२६

अर्जदार - ०१. सुनिता राम वैद्य, वय. ३९ वर्षे, धंदा घरकाम, ०२. स्वरा राम वैद्य, अ.पा.क. अर्जदार क. ०१ सुनिता राम वैद्य, वय. ०८ वर्षे, धंदा शिक्षण, ०३. सत्यशीला पंढरीनाथ वैद्य, वय. ६५ वर्षे, धंदा' घरकाम, सर्व राहणार' महाकाला ता. अंबड जि. जालना.

कलम :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज.

अर्जदार यांनी विधीज्ञ यांच्यामार्फत या न्यायालयात असा अर्ज केला आहे की, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. ०२ ही मयती मुलगी व अर्जदार क. ३ ही मयताची आई आहे. मयत नामे राम पंढरीनाथ वैद्य हे दिनांक २८/१२/२०२५ रोजी मयत्त झाले असुन अर्जदार हे मयताचे एकमेव वारस आहे. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामासाठी कार्यवाहीसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

करीता या जाहीर प्रगटन द्वारे सर्वत्र कळविण्यात येते की या बाबत जर कोणास काही एक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधीत प्रकरणात कायदया प्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १६/०९/२०२६ रोजी यांची माझ्या सहीनीशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**ए.बी. चव्हाण**
**क. लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**आदेशान्वये,**
**(के.ई. टेपल)**
**अधिक्षक दिवाणी न्यायालय (व. स्तर),**
**अंबड.जि. जालना**

---

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारने सहानुभूतीने पाहावे

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांकडे राज्य शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्यांचा लवकरात लवकर सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी मागणी न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

**मागण्यांचा लवकर निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा**

न्यायालयीन कर्मचारी आपल्या विविध मागण्यांसाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. मात्र, या मागण्यांबाबत शासनाकडून अपेक्षित सकारात्मक निर्णय होणे आवश्यक असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन योग्य तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. याबाबत नितीन एस. नायबळ, माजलगाव तालुका प्रतिनिधी, न्यायालयीन कर्मचारी संघटना यांनी सांगितले की, ''महाराष्ट्र सरकारने न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा लवकरात लवकर सहानुभूतीपूर्वक विचार केला नाही, तर कर्मचाऱ्यांकडून ठरल्याप्रमाणे भविष्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.'' शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची दखल घेऊन संवादातून प्रश्न सोडवावा आणि आंदोलनाची वेळ येऊ नये, अशी भूमिका संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शासन याबाबत कोणती भूमिका घेते, याकडे न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

---

## पान ६ वरुन...

### डांबून मारहाण केल्याप्रकरणी

अज्ञात ठिकाणी डांबून ठेवण्यात आलेले आहेत असे तहसीलदार, तसेच समाजसेवक यांच्या मदतीने डांबून ठेवलेल्या व्यक्तींची सुटका करून या गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणात आरोपी बाबुराव साहेबराव फड व भागचंद दराडे यांनी मा. न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. आरोपीच्या वतीने दाखल करण्यात आलेला डिफेन्स पाहून मा. न्यायालयाने दोन्ही आरोपींना जामीन मंजूर केला आहे. आरोप चे वतीने ॲड. तेजस नेहरकर यांनी काम पाहिले त्यांना ॲड.गौतम जी .नाईकवाडे, ॲड.रविराज व्ही.राठोड, ॲड. चव्हाण, ॲड. शेख शिकंदर यांनी मोलाचे सहकार्य केले.

### आष्टी, पाटोदा, शिरूरच्या

दुष्काळग्रस्त पिकांची भरपाई: खरिपातील अल्प पावसामुळे ऊस, सोयाबीन, तूर, मूग, कापूस, उडीद व बाजरी ही पिके करपून गेल्याने बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांचे अनुदान देणे.जनावरांसाठी चारा-पाणी अनुदान: जनावरांच्या चारा व पाण्यासाठी मोठ्या जनावरांना दररोज १०० रुपये आणि लहान जनावरांना ५० रुपयांप्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट अनुदान वर्ग करणे.

अधिकाऱ्यांची उपस्थिती: २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत निघणाऱ्या मोर्चादरम्यान जलसंपदा, कृष्णा खोरे विकास महामंडळ व गोदावरी खोरे विकास महामंडळाच्या सक्षम अधिकाऱ्यांना चर्चेसाठी उपस्थित राहण्याचे आदेश द्यावेत.या मागण्यांवर तातडीने ठोस कारवाई करून दुष्काळग्रस्त जनतेला न्याय द्यावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग तीव्र करण्याचा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. सदर निवेदनाच्या प्रती मुख्य अभियंता (जलसंपदा, छत्रपती संभाजीनगर), कार्यकारी संचालक (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे), कार्यकारी संचालक (गोदावरी खोरे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर) यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना पाठवण्यात आल्या आहेत.

### शेतात विजेचा शॉक

समजताच जिवाचीवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शेतात रात्रीच्या वेळी काम करताना घडलेल्या या दुर्घटनेमुळे शेतकरी वर्गातही चिंता व्यक्त केली जात आहे. विद्युत तारांपासून सुरक्षित अंतर ठेवण्याचे तसेच विद्युत उपकरणे हाताळताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या प्रकरणी विडा बीटचे अंमलदार उमेश आघाव पुढील तपास करीत आहेत.

### आठ दिवसात आश्वासन

जागर प्रतिष्ठानच्या शिष्टमंडळाने आमदार प्रकाश सोळंके यांची भेट घेऊन लवकरात लवकर बैठक लावावी नसता यापेक्षा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी जागर प्रतिष्ठानचे विशाल भैया जाधव,प्रा. बालासाहेब येवले, दिपक गुंजकर, गंगाभीषण जंगले, माऊली नाटकर, बाळू बनकर, अक्षय मोरे,भीमा ताटे,तुषार गायकवाड, योगानंद गुंजकर आदी.उपस्थित होते

### बीड नगर परिषदेतर्फे तारांगण

सायन्स पार्क आणि तारांगण उभारण्याच्या प्रस्तावाला यापूर्वी मान्यता मिळाल्याचे वृत्तही प्रसिद्ध झाले आहे.

शहराच्या विकासात आणखी एक महत्त्वाची भर व अजित दादा पवार यांनी दिलेले शब्द पूर्ण करण्यासाठी पालकमंत्री सुनेत्राताई पवार हे दिलेल्या सर्व शब्द पूर्ण करत आहेत

बीड शहरातील विज्ञान उद्यान आणि तारांगण हा शहराच्या विकासाशी संबंधित महत्त्वाचा उपक्रम मानला जात आहे. या विकासाच्या कामात शहरातील लोकप्रतिनिधी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आव्हान सभापती शेख निजाम यांनी केले आहे. यापूर्वी बीड जिल्ह्यातील विविध विकासकामांमध्ये विज्ञान उद्यान व तारांगण पार्कचा समावेश करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक कार्यक्रमात देण्यात आली होती.

कार्यक्रमाची तारीख : गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६
स्थळ : रेल्वे स्थानक, पालवण रोड, बीड

### प्रत्येक बुथ जिंकण्यासाठी

येत नाही. त्यासाठी वर्षभर जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होवून काम करावे लागते. कार्यकर्त्यांनी गावागावात, वाडी वस्तीवर आणि प्रत्येक बूथवर पोहोचले पाहिजे. पक्षाची संघटनात्मक पद नाही, जबाबदारी महत्त्वाची -संजय आंधळे या बैठकीत कार्यकर्त्यांच्या भूमिकेवर भाष्य करतांना भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी पदापेक्षा संघटनेसाठी केलेले काम अधिक महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. भाजपाचा कार्यकर्ता हा निवडणुकीपुरता कार्यकर्ता नसतो. पक्षाचा विचार आणि संघटनेची भूमिका समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम प्रत्येक कार्यकर्त्याने सातत्याने केले पाहिजे. आपल्याला केवळ निवडणूक लढवायची नाही, तर मजबूत संघटना उभी करायची आहे. ही संघटना पुढील अनेक वर्षे पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, यासाठी आजपासूनच नियोजनबध्द काम करण्याची गरज आहे, असेही संजय आंधळे यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. ताकद हीच आगामी राजकीय यशाची खरी गुरुकिल्ली आहे. आजच्या डिजीटल युगात सोशल मीडिया हे जनसंपर्काचे प्रभावी माध्यम बनले आहे. त्यामुळे भाजपा कार्यकर्त्यांनी सोशल मीडियाचा प्रभावी आणि सकारात्मक वापर करुन पक्षाचे विचार, शासनाच्या विविध योजना आणि विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवावीत, असे आवाहनही संजय आंधळे यांनी केले. यावेळी कृष्णा चव्हाण यांची सोशल मीडिया जिल्हा सहसंयोजकपदी आणि बाबुराव लंगडे यांची सोशल मीडिया तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबध्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करुन त्यांना आगामी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. पक्षाचा विचार डिजीटल माध्यमातून प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सोशल मीडिया विभागाने अधिक सक्रियपणे काम करण्याची अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे यांनी केले. तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे यांनी मानले. बैठकीस बीएलए-२, भाजपा पदाधिकारी, विविध आघाड्यांचे पदाधिकारी तसेच भाजपा व युवा मोर्चाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्काळाचे चटके बसत असताना सरकारकडून नियम-कायद्यांची भाषा!

## रोहित पवारांचा फडणवीसांवर हल्लाबोल; दुष्काळाचे चटके बसत असताना सरकारकडून गप्प

मुंबई : पावसाळा सुरू होऊन जवळपास तीन महिन्यांचा कालावधी उलटला असतानाही राज्यातील बहुतांश भागात समाधानकारक पाऊस झालेला नाही. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप पिके करपू लागली असून शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून पाण्याअभावी ऊस, कापूस, डाळिंब आणि केळीच्या बागांनाही फटका बसत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे.'सत्तेसाठी सगळ्या संवैधानिक तत्त्वांना तिलांजली देणारे मुख्यमंत्री आज राज्यातील शेतकऱ्याला दुष्काळाचे चटके बसत असताना नियम आणि कायदे सांगत आहेत. यापेक्षा मोठी शेतकऱ्यांची थट्टा दुसरी काय असेल?' असा सवाल रोहित पवार यांनी केला आहे.



दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर मदत करण्यासाठी सरकारने तत्काळ निर्णय घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. 'एनडीआरएफच्या सर्व्हेला ५ ऑक्टोबरची मर्यादा असेलही; पण तत्काळ मदत करण्याला कसली मर्यादा आहे का? की या सरकारची नियत नाही?' असा सवाल करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'आज आपल्या बाजूचे कर्नाटक राज्य दुष्काळाच्या सगळ्या उपाययोजना करत आहे. त्यावेळी आपले सत्ताधारी फक्त कोरड्या गप्पा करत आहेत,' अशी टीकाही रोहित पवार यांनी केली. पावसाच्या कमतरतेमुळे राज्यातील अनेक भागांत पिके संकटात सापडली असून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदतीची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. सरकारने राज्यभरात तत्काळ दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये, शेतमजुरांना २५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याबरोबरच विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. जुन्या ट्रिगरच्या आधारे पीकविमा देण्याची मागणी

पावसाच्या खंडामुळे पिकांचे नुकसान होत असताना पीकविमा संरक्षणही शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. पीकविम्यातून वगळण्यात आलेले जुने ट्रिगर पुन्हा लागू करून शेतकऱ्यांना तत्काळ पीकविम्याची रक्कम देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या इतर उपाययोजनाही तातडीने राबवाव्यात, अशी विनंती त्यांनी सरकारकडे केली आहे. राज्यातील अनेक भागांत गेल्या काही आठवड्यांपासून पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप हंगामावर परिणाम झाला आहे. काही ठिकाणी पिके वाचवण्यासाठी शेतकरी उपलब्ध पाण्याचा वापर करत आहेत, तर अनेक भागांत पाण्याअभावी उभी पिके करपू लागली आहेत. काही शेतकऱ्यांच्या पेरण्याही रखडल्या आहेत. पावसाअभावी ऊस, कापूस, डाळिंब आणि केळीच्या बागांना मोठा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उत्पादन खर्च आधीच वाढलेला असताना पिके हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकरी सध्या आभाळाकडे डोळे लावून बसला असून, पाऊस कधी बरसणार याची प्रतीक्षा करत आहे.

# कापूस पिकावर रोग दिसताच करा हे काम



कापूस हे आपल्याकडील एक मुख्य नगदी पीक आहे. मात्र, पावसाळ्याच्या दिवसांत किंवा दमट हवामानात कापसावर विविध रोग आणि किडींचा प्रादुर्भाव वेगाने वाढतो. कापूस पिकाचे नुकसान टाळण्यासाठी आणि दर्जेदार उत्पादनासाठी शेतात रोग दिसताच शेतकऱ्यांनी तात्काळ खालील उपाययोजना कराव्यात.

मुख्य रोग आणि त्यांची प्राथमिक लक्षणे :पानावरील ठिपके : पानांवर लसणाची किंवा तपकिरी रंगाचे गोलाकार ठिपके पडतात. दहिया रोग : पानाच्या खालच्या बाजूला पांढरट-राखाडी रंगाची बुरशी (दह्यासारखी) दिसते. लाल लाल्या रोग : अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे जुनी पाने लाल होतात आणि कडा सुकतात. मूळ कूज / मर रोग : झाड अचानक सुकते आणि उपटल्यास मुळे सडलेली दिसतात.

रोग दिसताच करायचे तात्काळ उपाय :

बाधित झाडे/पाने वेगळी करा: संसर्ग रोखणे.शेतात एखाद्या रोगाची सुरुवात झाल्यास, रोगट पाने किंवा झाडे उपटून शेताबाहेर नेऊन नष्ट करा किंवा जमिनीत गाडून टाका. यामुळे हवेद्वारे किंवा स्पर्शाने पसरणाऱ्या बुरशीजन्य रोगांचा प्रसार थांबतो.

बुरशीजन्य रोगांवर नियंत्रण : ठिपके किंवा दहिया रोगाची लक्षणे दिसताच खालीलपैकी एका बुरशीनाशकाची फवारणी करा. कॉपर ऑक्सीक्लोराईड : २५ ग्रॅम + स्ट्रिप्टोसायक्लिन २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किंवा कार्बेन्डाझिम + मॅन्कोझेब (उदा. साफ पावडर): २० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी. जर कापसाची पाने लाल पडत असतील, तर ती अन्नद्रव्यांची कमतरता असते. याच्या नियंत्रणासाठी मॅग्नेशियम सल्फेट (चसडज४) ५० ग्रॅम आणि १९:१९:१९ विद्राव्य खत ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मर रोग किंवा मूळ कूज लागण्याचे मुख्य कारण म्हणजे शेतात पाणी साचणे. त्यामुळे कापसाच्या तासांमधून चर काढून साचलेले पाणी शेताबाहेर काढून द्या, जेणेकरून मुळांना हवा मिळेल.

फवारणी करताना घ्यावयाची काळजी : पावसाळी वातावरणात औषध फवारताना त्यात चांगल्या दर्जाचे सिलिकॉन आधारित स्टिकर (चिकटवणारे औषध) अवश्य वापरा. रोगासोबतच रसशोषक किडींचा (मावा, तुडतुडे, पांढरी माशी) प्रादुर्भाव असल्यास तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य कीटकनाशक बुरशीनाशकासोबत मिक्स करा.

# कमी दिवसांत भरपूर नफा मिळवून देणारे नगदी पीक-फुलकोबी लागवड!

फुलकोबी हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे आणि फायदेशीर नगदी पीक आहे. योग्य नियोजन आणि आधुनिक पद्धतीचा वापर केल्यास फुलकोबीच्या शेतीतून कमी दिवसांत भरपूर नफा मिळवता येतो. महाराष्ट्रातील हवामानानुसार फुलकोबी लागवडीची संपूर्ण माहिती आज आपण पाहणार आहोत.



१. हवामान आणि जमीन

हवामान: फुलकोबी हे प्रामुख्याने थंड आणि दमट हवामानात येणारे पीक आहे. गड्डा तयार होताना तापमान १५४उ ते २०४उ च्या दरम्यान असणे उत्तम मानले जाते. जास्त तापमानामुळे गड्ड्यांचा दर्जा बिघडतो. जमीन: मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असलेली जमीन (सामू/कि६ ते ७) या पिकासाठी योग्य ठरते.

२. लागवडीचा हंगाम आणि सुधारित जाती महाराष्ट्रात प्रामुख्याने तीन हंगामात कोबीची लागवड केली जाते पावसाळी (लवकर येणाऱ्या)- जून - जुलै:पूसा कतकी, अर्ली कुंवारी, पुसा दिपाली, सिंजेंटा ६०९९ हिवाळी (मध्यम) ऑगस्ट - सप्टेंबर: पुसा शुभ्रा, पुसा सिंथेटिक, पंत शुभ्रा उन्हाळी (उशिरा येणाऱ्या)ऑक्टोबर - नोव्हेंबर: पुसा स्नोबॉल, स्नोबॉल १६

३. रोपवाटिका व्यवस्थापन फुलकोबीची थेट शेतात लागवड न करता आधी रोपे तयार केली जातात.१ हेक्टर लागवडीसाठी सुमारे ३७५ ते ५०० ग्रॅम बियाणे पुरेसे होते.गादीवाफ्यावर बियाणे पेरून गादीवाफे प्लास्टिक किंवा गवताने झाकावेत. ५ ते ६ दिवसांत कोंब आल्यावर आच्छादन काढून टाकावे.रोपे साधारण ३ ते ४ आठवड्यांची (४ ते ५ पानांवर) झाली की ती मुख्य शेतात लावण्यासाठी तयार होतात.

४. मुख्य शेताची तयारी आणि लागवड शेत चांगले नांगरून, कुळवून भुसभुशीत करावे आणि हेक्टरी २० ते २५ टन चांगले कुजलेले शेणखत मिसळावे.

लागवडीचे अंतर: ✻ लवकर येणाऱ्या जातींसाठी: ४५ सेमी ह्व ४५ सेमी किंवा ४५ सेमी ह्व ३० सेमी.उशिरा येणाऱ्या जातींसाठी: ६० सेमी ह्व ४५ सेमी.

रोपांची लागवड नेहमी संध्याकाळच्या वेळी करावी आणि लागवडीनंतर लगेच हलके पाणी द्यावे.

५. खत आणि पाणी व्यवस्थापन खत व्यवस्थापन: नत्र, स्फुरद आणि पालाश (१५०:७५:७५ किलो प्रति हेक्टर) द्यावे. नत्राचा अर्धा डोस आणि स्फुरद-पालाश पूर्ण डोस लागवडीच्या वेळी द्यावा. उर्वरित नत्र लागवडीनंतर १ महिन्याने द्यावे. बोरॉनचा वापर: कोबीचे गड्डे पांढरेशुभ्र राहण्यासाठी आणि कडक होण्यासाठी प्रति एकरी ५ किलो बोरॅक्स (ड्डीरु) खत देणे अत्यंत आवश्यक आहे. बोरॉनच्या कमतरतेमुळे गड्ड्यांवर तांबडे डाग पडतात. पाणी: पिकाला जमिनीच्या मगदुरानुसार १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. गड्डा तयार होताना पाण्याचा ताण पडू देऊ नये.

६. काढणी आणि उत्पादन जातीनुसार लागवडीनंतर ६० ते ९० दिवसांत गड्डे काढणीस तयार होतात.गड्डा घट्ट आणि पांढरा असतानाच, पानाच्या आवरणासह (दोन पानांसह) देठ कापून काढणी करावी. उत्पादन: सरासरी हेक्टरी २०० ते २५० क्विंटल उत्पादन मिळते.

# रब्बी ज्वारीच्या लागवडीचं संपूर्ण नियोजन

एल निनोमुळे रब्बी हंगामाची चिंता शेतकऱ्यांना आहे. अशा कमी पावसाच्या परिस्थितीत धान्यासोबत जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी रब्बी ज्वारीची लागवड फायदेशीर ठरू शकते. योग्य वाणाची निवड, वेळेवर पेरणी, संतुलित खत व्यवस्थापन आणि संवेदनशील अवस्थेत संरक्षित सिंचन केल्यास ज्वारीचे चांगले उत्पादन घेता येते.



पेरणीचा कालावधी : रब्बी ज्वारीची पेरणी साधारण १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या कालावधीत करावी. उशिरा पेरणी केल्यास खोडमाशीचा प्रादुर्भाव वाढून उत्पादनात घट होण्याची शक्यता असते. ज्वारीसाठी चांगला निचरा होणारी हलकी, मध्यम ते भारी जमीन योग्य आहे. पेरणीपूर्वी जमिनीची चांगली मशागत करून शेवटच्या कुळवाच्या पाळीत हेक्टरी १० ते १५ गाड्या चांगले कुजलेले शेणखत मिसळावे.

वाणांची निवड :रब्बी ज्वारीसाठी पीकेव्ही क्रांती, पीकेव्ही शाश्वत, फुले सुचित्रा, फुले वसुधा, फुले अनुराधा, सीएसव्ही ४० एफ, फुले अमृता, फुले यशोमती, परभणी शक्ती, फुले चित्रा, परभणी ज्योती, परभणी मोती, सीएसव्ही २२ आणि आरएसव्ही १००६ या वाणांची निवड करता येते. यापैकी फुले यशोमती, फुले वसुधा आणि फुले सुचित्रा हे कोरडवाहू आणि कमी पाण्याच्या परिस्थितीसाठी उपयुक्त वाण असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले आहे.

पेरणीचे नियोजन

रब्बी ज्वारीसाठी हेक्टरी ७.५ ते १० किलो बियाणे लागते. पेरणी दोन चाड्यांच्या तिफणीने करावी. यामुळे पेरणीसोबत खत देणेही सोपे होते. पिकातील अंतर साधारण ४५ बाय १० सेंटीमीटर ठेवावे.

खत व्यवस्थापन : कोरडवाहू ज्वारीसाठी हेक्टरी ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश द्यावे. यासाठी साधारण ११० किलो युरिया, १५६ किलो एसएसपी आणि ४२ किलो एमओपी लागते. बागायती ज्वारीसाठी हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश द्यावे. यासाठी २०:२०:०० खत २०० किलो आणि एमओपी ६७ किलो किंवा युरिया १७५ किलो, एसएसपी २५० किलो आणि एमओपी ६७ किलो, यापैकी एक पर्याय वापरता येतो.

खत देताना अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद आणि संपूर्ण पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. उर्वरित नत्र पेरणीनंतर साधारण ३० दिवसांनी वरखत म्हणून द्यावे. वरखत देताना जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करावी.

आंतरमशागत : पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी विरळणी करावी. खोडमाशीचा प्रादुर्भाव झालेली रोपेही काढून टाकावीत. पीक सुरुवातीचे ३५ ते ४० दिवस तणविरहित ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी पहिली कोळपणी पेरणीनंतर तीन आठवड्यांनी आणि दुसरी पाच आठवड्यांनी करावी. आवश्यकतेनुसार एक ते दोन वेळा खुरपणी करावी. तणनाशकाचा वापर करायचा असल्यास पेरणीनंतर साधारण २५ दिवसांनी २,४-डी अमाईन सॉल्ट ५८ टक्के एसएलची ६० मिलिलिटर प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

पाण्याची गरज : ज्वारी हे प्रामुख्याने दवावर येणारे पीक असले तरी पाण्याची उपलब्धता असल्यास संवेदनशील अवस्थेत संरक्षित सिंचन करावे. पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी जोमदार वाढीच्या अवस्थेत, पोटरी येताना, फुलोऱ्यात आणि दाणे भरण्याच्या अवस्थेत पाण्याची उपलब्धता महत्त्वाची असते.

काढणी : वाणाच्या कालावधीनुसार ज्वारीची काढणी करावी. दाण्यामध्ये साधारण १० ते १२ टक्के ओलावा असताना काढणी करणे योग्य ठरते. योग्य नियोजन केल्यास कमी पाण्याच्या परिस्थितीतही रब्बी ज्वारीतून धान्यासोबत जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करता येते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५९८ : फ्रांस चे शासक हेनरी चतुर्थ (क्शपी खत) यांनी इसाई धर्माचा नांत चा प्रख्यात आदेश जारी केला.

१७८४ : रेगुलेटिंग क्टच्या दुर्बलतेवर मात करण्यासाठी आणि ब्रिटिशांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ब्रिटीश संसदेने पिट्स इंडिया क्ट पास केला.

१८९८ : हॅनीबल गुडविन यांनी सेल्यूलॉइड फोटोग्राफिक फिल्म चे पेटंट घेतले.

१९१३ : साली ब्रिटीश धातुशास्त्रज्ञ हॅरी ब्रेअर्ली यांनी स्टेनलेस स्टीलचा आविष्कार केला.

१९२२ : लीबीयातील अझिजीया येथे ५७.२ओ सेल्सिअस ही जगातील आजवरच्या सर्वाधिक तापमानाची नोंद झाली.

१९४८ : ऑपरेशन पोलो - विलीनीकरणासाठी भारतीय सैन्याने हैदराबादवर चढाई केली.

१९८५ : सुपर मारियो गेम जपान मध्ये प्रकाशित झाला.

१९८९ : आर्चबिशप डेसमंड टुटू यांनी वर्णद्वेषी धोरणाला विरोध करण्यासाठी दक्षिण अफ्रिकेत विशाल मोर्चा काढला.

१९९६ : महिला आणि बालकल्याणासाठी लक्षणीय कामगिरी बजावणार्या महिलेला देण्यात येणारा 'श्रीमती जानकीदेवी बजाज पुरस्कार' ज्येष्ठ समाजसेविका आणि स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्त्या श्रीमती इंदुमती पारिख यांना देण्यात आला.

२००० : चीनच्या शेनयांग येथे १ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २००० दरम्यान खेळण्यात आलेली २४-खेळाडूंची श्रेणी दतख ची बुद्धिबळ स्पर्धा म्हणजेच फिड वर्ल्ड कप विश्वनाथ आनंद यांनी जिंकला

२००३ : मेंडोलिन वादक यू. श्रीनिवास यांना राष्ट्रीय कुमार गंधर्व पुरस्कार जाहीर.

२००३ : ज्येष्ठ गायक पं. दिनकर कैकिणी यांना तानसेन यांना राष्ट्रीय कुमार गंधर्व पुरस्कार जाहीर.

२००८ : दिल्ली येथे झालेल्या बॉम्बस्फोटांच्या मालिकेत ३० जण ठार तर सुमारे १३० जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४५ : साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ब्रिटीश अध्यक्ष हेनरी कॉटन (क्शपी ऊेींप) यांचा जन्मदिन.

१८५२ : गणेश जनार्दन आगाशे - नामांकित शिक्षक, संस्कृत पंडित, व्युत्पन्न ग्रंथकार, उत्तम वक्ते व इंदूर येथे भरलेल्या १० व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (मृत्यू: )

१८५७ : मिल्टन हर्शे - 'द हर्शे चॉकलेट कंपनी'चे संस्थापक (मृत्यू: १३ आक्टोबर १९४५)

१८६५ : भारतीय-इंग्रजी फील्ड मार्शल विल्यम बर्डवुड यांचा जन्म. (मृत्यू: १७ मे १९५१)

१८८६ : सर रॉबर्ट रॉबिनसन - वनस्पतिज रंग व अल्कलॉईड्सवर संशोधन करणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९७५)

१८९० : मोनाको ग्रांप्री चे संस्थापक अँटोनी नोगेस यांचा जन्म. (मृत्यू: २ ऑगस्ट १९७८)

१९३२ : डॉ. प्रभा अत्रे - शास्त्रीय गायिका

१९३९ : साली प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी व निबंधकार भागवत रावत यांचा जन्मदिन.

१९४६ : साली परमवीर चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय सैन्य दलाचे अधिकारी मेजर रामास्वामी परमेश्वरन यांचा जन्मदिन.

१९६७ : मायकेल जॉन्सन - अमेरिकन धावपटू

१९६९ : शेन वॉर्न - ऑस्ट्रेलियन लेगस्पिनर

१९७१ : गोरान इव्हानिसेव्हिच - क्रोएशियाचा लॉन टेनिसखेळाडू

१९७६ : क्रेग मॅकमिलन - न्यूझीलंडचा अष्टपैलू क्रिकेटपटू

१९८० : भारतीय हॉकी खेळाडू वीरेन रास्किन्हा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९३ : मामा परमानंद - पत्रकार व विचारवंत, प्रार्थना समाजाचे एक संस्थापक (जन्म: ३ जुलै १८३८)

८१ : टायटस - रोमन सम्राट (जन्म: ३० डिसेंबर ३९)

१९२६ : श्रीधर पाठक - हिन्दी कवी, लखनौ येथे भरलेल्या पाचव्या हिन्दी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (जन्म: ११ जानेवारी १८५८)

१९२८ : सुप्रिसद्ध हिंदी कवी श्रीधर पाठक यांचे निधन. (जन्म: ११ जानेवारी १८५८)

१९२९ : लाहोर कटातील क्रांतिकारक जतिन दास यांनी तुरुंगातील जुलुमाचा निषेध म्हणून केलेल्या उपोषणात त्यांचा ६३ व्या दिवशी मृत्यू झाला. (जन्म: २७ आक्टोबर १९०४)

१९७१ : केशवराव त्र्यंबक दाते - चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते, नाट्यशिक्षक. महाराष्ट्र नाटक मंडळी या संस्थेच्या नाटकांमधून त्यांनी काही स्त्री नायिकांच्या भूमिका केल्या. (जन्म: २४ सप्टेंबर १८८९ - अडिवरे, रत्नागिरी, महाराष्ट्र)

१९७३ : भारतीय कवी आणि तत्त्ववेक्षक सज्जाद झहिर यांचे निधन. (जन्म: ५ नोव्हेंबर १९०५)

१९७५ : भारतीय गायक आणि संगीतज्ञ मुदिकॉन्दाम वेंकटरम अय्यर यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १८९७)

१९९५ : डॉ. महेश्वर नियोग - प्रख्यात आसामी साहित्यिक आणि इतिहासकार, पद्मश्री (१९७४), आसाम साहित्य परिषदेचे अध्यक्ष (जन्म: ७ सप्टेंबर १९१५ - कमरफादिया, शिवसागर, आसाम)

१९९७ : लालजी पाण्डेय तथा 'अंजान' - हिन्दी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार (जन्म: २८ आक्टोबर १९३०)

२००४ : गर्भनिरोधक गोळी चे संशोधक लुइस ई. मिरमोंटेस यांचे निधन. (जन्म: १६ मार्च १९२५)

२०१२ : रंगनाथ मिश्रा - भारताचे २१ वे सरन्यायाधीश (जन्म: २५ नोव्हेंबर १९२६)

cmyk



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा

अनंतपाळ। प्रतिनिधी

यंदा पावसाने पाठ फिरवली असुन,संपुर्ण खरीप हंगाम वाया गेला आहे .त्यामुळे तालुक्यातील विविध गावातील शेतर्क़याच्या वतीने बुधवारी तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला.यावेळी एकंदर १४ मागण्याचे निवेदन देण्यात आले.यावेळी तालुक्यातील विविध गावातील शेतर्क़याची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शिरूर अनंतपाळ तालुक्यातच्या पावसाची सरासरी ७५० मिमी एवढी आहे.परंतु पावसाळा संपला तरीही यंदा केवळ २८० मिमी एवढा अत्यल्प पाऊस झाल्यामुळे नदी,नाले,तलाव कोरडेठाक पडत असुन, पशुधनाच्या चारा पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहिर करण्यात यावा.यासाठी बुधवारी विविध गावातील शेतर्क़यानी तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला.यावेळी शेतर्क़याच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन तातडीने वाया गेलेल्या पिकाचे पंचनामे करण्यात यावेत.शेतर्क़यानां तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी.यासह विविध १४ मागण्याचे निवेदन तहसीलदार किशोर यादव याना देण्यात आले .यामध्ये तातडीने पीकविमा देण्यात यावा,विम्यासाठी फोर ट्रीगर पध्दती लागु करावी,मागील गाळप हंगामातील ऊसाला ५०० रूपये अतिरिक्त भाव देण्यात यावा,विविध कारखान्याकडील थकीत ऊस बिले देण्यात यावे,विविध कार्यालयाकडून होणारी शेतर्क़याची लुट थांबवावी,नगरपंचायत हद्दीतील शेतर्क़याना मनरेगा योजना चा लाभ द्यावा,आरीमोड बाबळगाव लातूर रस्ता दुरूस्त करावा,स्मार्ट मिटर बसवु नयेत,गोठे,विहीरीची थकीत बिले द्यावीत,मनरेगातुन शेतकरी, मजुर याना मदत देण्यात यावी,कुंपणासाठी अनुदान देण्यात यावे, कर्जमाफीचा लाभ तातडीने द्यावा,कोरडा दुष्काळ जाहिर करून तात्काळ आर्थिक मदत द्यावी,मोर्चात तालुक्यातील २ हजार शेतकरी सहभागी झाले होते. (सत्ताधार्य़ानी दाखविले वाळलेले सोयाबीन..) येथील नगरपंचायतचे नगरसेवक तसेच येरोळ गटाच्या जिल्हा परिषद सदस्यातुळसाबाई लोंढे ,सरपंच अक्षय पाटील यासह अनेक सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकार्य़ानी मंगळवारी तहसीलदार किशोर यादव याना वाळलेले सोयाबीन दाखवुन निवेदन देत तातडीने पंचनामे करून कोरडा दुष्काळ जाहिर करून आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.




# उदगीरात मोठ्या प्रमाणात खवा, पनीरची साठवणूक?

## ऐन सणासुदीच्या काळात भेसळयुक्त पदार्थ विक्रीची शक्यता



उदगीर। प्रतिनिधी

ऐन सणासुदीच्या काळात भेसळयुक्त दूध व दुग्धजन्य पदार्थांची साठवणूक येथील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात होत असून,अन्न व औषध प्रशासन याकडे लक्ष देईल का? अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांची आहे.

मागील काही दिवसांपासून उदगीर मध्ये मोठ्या प्रमाणात खवा, पनीरची आवक वाढली आहे.ऐन सणासुदीच्या काळात दूध व दुग्धजन्य पदार्थ जसे पनीर व खवा आदी बाजारात मागणी वाढत आहे. याचाच फायदा घेऊन व्यापारी भेसळयुक्त खवा, पनीर असे चोरट्या मार्गाने बाजारात विक्री करतात. मागील काही दिवसांत टेम्पो मधून खवा गल्ली बोळात आणून घरात साठवणूक केल्याचे दिसून आले आहे.अशा साठेबाज व्यापा-यावर अन्न व औषध प्रशासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून व्यक्त होत आहे. भेसळयुक्त खवा व पनीर खाल्ल्याने आजार वाढू लागले आहेत. अन्न व औषध प्रशासनाने अशा पदार्थांचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून भेसळ होत आहे का हे तपासून त्यावर योग्य ती कारवाई करण्याचा सपाटा लावला आहे. यातील दोषींवर कठोर कारवाई करण्याचा सपाटा लावला आहे. महाराष्ट्र राज्यातील अनेक मोठ्या शहरात अशी कारवाई सुरू असल्यामुळे व्यापारी वर्गाला चांगलाच फटका बसला आहे हे विशेष.

# मान काम समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

## मागण्या मंजूर न केल्यास बेमुदत संप-कल्याणराव टेपले

अंबड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट-क) संलग्न जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेने न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. समान कामासाठी समान वेतनाच्या मागणीसह अन्य प्रश्नांवर शासनाने निर्णय न घेतल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष कल्याणराव टेपले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली आहे.मा. उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार वरिष्ठ वेतनवाढीचा प्रश्न सन २००६ पासून प्रलंबित असून, राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत सुमारे ३४ हजार कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या वतीने उच्च न्यायालयाकडे मागणी करण्यात आली होती. मागणी मंजूर करून प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्यानंतरही शासनाकडून सुमारे २० महिने उलटूनही निर्णय झालेला नसल्याचे पत्रात नमूद आहे.दरम्यान, आंदोलनाची कायदेशीर नोटीस शासन आणि उच्च न्यायालयाला देण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले असून न्यायालयीन व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनविषयक मागण्यांवर तसेच रिक्त पदे आणि वाढत्या कामाच्या ताणाच्या प्रश्नावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

मागण्या मंजूर न झाल्यास आंदोलनाची तीव्रता वाढवत अखेर बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारला जाईल,अशी भूमिका जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेने घेतली आहे. पत्रावर संघटनेचे अध्यक्ष कल्याणराव टेपले यांची स्वाक्षरी आहे.



### कामाचा वाढता ताण; कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्या

न्यायालयीन कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, रिक्त पदे आणि वाढलेले खटले यामुळे कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढत असल्याचे संघटनेने म्हटले आहे. शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार ५०० खटल्यांसाठी एक न्यायालय स्थापन करण्याची आवश्यकता असतानाही पुरेशा न्यायालयांची स्थापना न झाल्यामुळे प्रत्येक न्यायालयात मोठ्या प्रमाणात खटले प्रलंबित राहत आहेत, असा दावा पत्रात करण्यात आला आहे.याचा परिणाम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या कामावर होत असून, वाढलेल्या कामाच्या प्रमाणाच्या तुलनेत मनुष्यबळ उपलब्ध नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना समान कामासाठी समान वेतन मिळावे, या मागणीसाठी आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### टप्प्याटप्प्याने होणार आंदोलन

संघटनेने आंदोलनाचा कार्यक्रमही जाहीर केला आहे. त्यानुसार १६ सप्टेंबर २०२६ रोजी काळ्या फिती लावून काम करण्यात येणार आहे. त्यानंतर १६ व १७ ऑक्टोबररोजी दोन दिवस काळ्या फिती लावून काम केले जाणार आहे.मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास ५ नोव्हेंबर रोजी एक दिवस सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानंतरही मागण्या मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून राज्यभरातील दुय्यम न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार, असा स्पष्ट इशारा संघटनेने दिला आहे.

# पाथर्डी दुष्काळग्रस्त जाहीर करून हेक्टरी एक लक्ष पशुसाठी चारा छावण्या सुरू करा -सुनील खेडकर!

पाथर्डी । प्रतिनिधी

यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने पाठ फिरवली असून दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याने पाथर्डी तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील झालेल्या पिकांचे नुकसानी पोटी सरसकट पंचनामे करून हेक्टरी एक लक्ष रुपये मदत जाहीर करून पाथर्डी तालुक्यात पाण्याचे टँकर आणि जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करा अशी मागणी सरपंच सुनील खेडकर यांनी केली आहे सुनील खेडकर यांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की पाथर्डी तालुक्यात यावर्षी अत्यंत कमी पाऊस झाल्याने आज दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.



तालुक्यातील सर्व तलाव विहिरी कोरड्या पडल्या असून पाण्यावाचून माणसांचे व चाऱ्यावाचून जनावरांचे प्रचंड हाल होत आहेत अशा परिस्थितीत मागेल तिथे टँकर देणे व प्रस्ताव आल्यावर विलंब न लावता तात्काळ मंजुरी देऊन टँकर सुरू होणे तसेच जनावरांना चाऱ्यासाठी चारा छावण्या अथवा चारा डेपो सुरू करणे अत्यंत गरजेचे आहे तरी आपण आपल्या यंत्रणेमार्फत तालुक्यात जिथे गरज आहे तिथे तात्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात व त्यासाठी तातडीने कार्यवाही सुरू करण्यात यावी कारण आज परिस्थिती आहे त्यापेक्षा बिकट परिस्थिती येत्या १५ ते २० दिवसानंतर होणार आहे त्यासाठी आपण दुष्काळ व पाणीटंचाई निर्माण झाल्याने दुष्काळाशी सामना करण्याची तयारी करणे गरजेचे आहे तरी आपण शेतकऱ्यांचे पशुधन वाचवण्यासाठी शेतकऱ्यांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून तालुक्यात चारा छावण्या सुरू करण्यासाठी व खरीप हंगामातील शेतकऱ्यांची कि पूर्णपणे उध्वस्त झाल्याने सरसकट पंचनामे करून हेक्टरी एक लक्ष रुपये मदत देण्याची कार्यवाही कराल अशी अपेक्षा शासन व प्रशासनाने या संदर्भात तातडीने पावले उचलावीत अन्यथा खरवंडी कासार येथे जनआंदोलन छेडण्यात येईल असा इशारा सुनील खेडकर यांनी दिला आहे.

# सेवा संकल्प अभियान' प्रभावीपणे राबविण्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे निर्देश

जालना। प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील २५ वर्षांच्या कारकीर्दीनिमित्त तसेच सामान्य नागरिकांपर्यंत विविध शासकीय सेवा आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ जलदगतीने पोहोचवण्यासाठी राज्य शासनाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'सेवा संकल्प अभियान' राबवण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागांनी या अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे योग्य नियोजन करून ते प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

या अभियानाच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आज संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय ऑनलाईन आढावा बैठकीत श्रीमती मित्तल या बोलत होत्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी (महसुल) मनीषा दांडगे यांच्यासह ऑनलाईन जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, जालना महानगर पालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा, सर्व उपविभागीय अधिकारी, संबंधीत विभाग प्रमुख यांची उपस्थित होती. यावेळी बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी सांगितले की, या महिनाभराच्या सेवा संकल्प अभियान अंतर्गत जिल्हा व प्रत्येक तालुकास्तरावर 'सेवा सेतू शिबिरे' आयोजित करण्याचे नियोजन करावे. याद्वारे नागरिकांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देणे, कार्यालयांमधील प्रलंबित कामांचा गतीने निपटारा करणे, 'नाविन्यपूर्ण संकल्पना' मांडण्यासाठी इनोव्हेशन चॅलेंज, 'सेवा माझे योगदान', स्वच्छता मोहीम आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करावे. या अभियानाचा कालावधी निश्चित असल्याने, सर्व यंत्रणांनी आपापल्या विभागाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करून हे अभियान यशस्वी करावे. तसेच राबविलेल्या सर्व उपक्रमाची व्यापक प्रसिध्दी करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.





# शासकीय सेवेत निवड झालेल्या भूमिपुत्रांचा सन्मान

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र मोहटादेवी लगत असलेल्या मोहटा गावात तब्बल नऊ उमेदवारांची शासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांनी त्यांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता गावच्या या यशस्वी हिऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे व त्यांच्या उज्वल आयुष्यासाठी एक मायेचा आपुलकीचे प्रेमाचे पुष्प देऊन त्यांच्या पुढील यशस्वी जीवन प्रवासाला शुभेच्छा देण्याचे काम गावकऱ्यांनी एकत्र येऊन केले विविध शासकीय विभागात नियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातून अत्यंत जिद्द कष्ट परिश्रम व अतिशय कठीण स्पर्धेच्या काळात स्वतःला सिद्ध करून हे नेत्रदीपक यश संपादित केले.

यावेळी काही विद्यार्थ्यांना आपले आनंदाश्रू आवरता आले नाहीत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मारुती महादेव दहिफळे (स्टेनोग्राफर) मयूर अर्जुन दहिफळे (जिल्हा सहकारी बँक) म्हातारदेव अजिनाथ खाडे (स्टेनोग्राफर) अंबादास आजिनाथ दहिफळे (जि प.शिक्षक) प्रशांत रामदास दहिफळे (जि.प.शिक्षक) सुरज शंकर घुगे (जि.प.शिक्षक) सोनाली शंकर घुगे (जि.प.शिक्षक) सीमा प्रवीण दहिफळे (जि.प.शिक्षक) प्रियंका नितीन पालवे (जि.प.शिक्षक) यशस्वी विद्यार्थ्यांना गावकऱ्यांनी सन्मानित केले यावेळी उपसरपंच अविनाश फुंदे संदीप पालवे मारुती खाडे बाबासाहेब दहिफळे पोपट खाडे श्रीधर गिरी रामकिसन फुंदे शामराव दहिफळे मनीषा पालवे अंबादास पालवे पांडुरंग दहिफळे मारुती दहिफळे अजय आव्हाड अक्षय गोसावी अक्षय दहिफळे रामदास दहिफळे देविदास दहिफळे भगवान दहिफळे मंदाबाई दहिफळे शिवाजी पालवे चंद्रकांत दहिफळे राजेंद्र पालवे काशीराम दहिफळे भास्कर दहिफळे तसेच गावकरी उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३३३/२०२६**
**लक्ष्मी व इतर विरुध्द निरंक**
**मार्फत ॲड. जे. एस. पठाण**

अर्जदार :-१. लक्ष्मी भ्र. गौतम गिते, वय ६० वर्षे, धंदा शेती,२. चांगदेव पि. गौतम गिते, वय ३५ वर्षे, धंदा शेती,३. स्वामी पि. गौतम गिते, वय ३९ वर्षे, धंदा शेती, ४. राणी भ्र. भाऊसाहेब नागरगोजे, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, अर्जदार क्र. १ ते ३ रा. गितेवाडी ता. पाटोदा जि. बीड, अर्जदार क्र. ४ रा. कऱ्हेवडगांव ता. आष्टी जि. बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत गौतम पि. बाबुराव गिते यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी गौतम पि. बाबुराव गिते यांचा मृत्यु दिनांक ०९/०१/२०२६ रोजी गितेवाडी ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत गौतम पि. बाबुराव गिते यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९ ऑक्टोबर २०२६.

आदेशावरुन,
स्वाक्षरित
क. लिपीक

स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा.
ता. पाटोदा, जि. बीड.



## जाहीर प्रगटन

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३२५/२०२६**
**अंकुश व इतर विरुध्द निरंक**
**मार्फत ॲड. बी. एस. नागरगोजे**

अर्जदार :-१. अंकुश पि. दशरथ बांगर, वय ६९ वर्षे, धंदा शेती,२. श्रीहरी पि दशरथ बांगर, वय ६५ वर्षे, धंदा शेती.३ जगन्नाथ पि. दशरथ बांगर, वय ५६ वर्षे, धंदा शेती, अर्जदार क्र १ ते ३. रा. कुटेवाडी तहत पारनेर ता. पाटोदा जि. बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत दशरथ पि. साधु बांगर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी दशरथ पि. साधु बांगर यांचा मृत्यु दिनांक १८/१०/२०१८ रोजी कुटेवाडी ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. मयतास मुलगी नाही.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्रानी आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत अथवा न्याच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याने नारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत दशरथ पि. साधु बांगर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १२ ऑक्टोंबर २०२६.

आदेशावरुन,
स्वाक्षरित
क. लिपीक

स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा.
ता. पाटोदा, जि. बीड.


# प्रतिबंधित पानमसाला व तंबाखूची वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा

## इनोव्हा क्रिस्टासह २२ लाख ७० हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त ;शिरूर अनंतपाळ पोलिसांची कारवाई

लातूर। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ चोरट्या विक्रीच्या उद्देशाने वाहनातून वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे प्रभारी परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक अक्षय जाधव यांच्या पथकाने कारवाई केली. या कारवाईत प्रतिबंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ तसेच वाहतुकीसाठी वापरलेली टोयोटा इनोव्हा क्रिस्टा कार असा एकूण २२ लाख ७० हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजता उदगीर-लातूर मुख्य रस्त्यावर येरोळ मोडजवळील श्रद्धा लंच होमसमोर पोलिसांनी सिल्वर रंगाची टोयोटा इनोव्हा क्रिस्टा (एमएच १२ आरएन ९३०२) थांबवून झडती घेतली. यावेळी वाहनामध्ये विविध ब्रँडचा प्रतिबंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणात आढळून आला.

या कारवाईत विविध लेबलिंग असलेला पानमसाल, सुगंधी तंबाखू, गुटखा आदी प्रतिबंधित पदार्थ जप्त करण्यात आले. जप्त मालाची एकूण किंमत ४ लाख ७० हजार १८० रुपये, तर वाहतुकीसाठी वापरलेल्या इनोव्हा क्रिस्टा कारची किंमत १८ लाख रुपये, अशी एकूण २२ लाख ७० हजार १८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी फारुक हमीद सय्यद (वय ४२, रा. इंडियन बँकेशेजारी, माजलगाव, जि. बीड), सिद्दीकी अब्दुस्समद जुबेर (वय २२, रा. अशोकनगर, माजलगाव, जि. बीड)यांच्याविरुद्ध शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २५९/२०२६, कलम १२३, २२३, २७४, २७५ भारतीय न्याय संहिता तसेच अन्नसुरक्षा व मानके अधिनियम, २००६ चे कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वाहनाच्या झडतीदरम्यान एमएच २३ बी ७३५१ क्रमांकाची अतिरिक्त नंबर प्लेटही मिळून आली असून, तिच्याबाबतही तपास करण्यात येत आहे.सदर कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात परि. पोलीस उपअधीक्षक अक्षय जाधव यांच्या आदेशाने पोलीस ठाणे शिरूर अनंतपाळ च्या पोलीस पथकाने केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रायबोळे करीत आहेत.

cmyk

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी हक्क मोर्चाचे 'हलगी बजाव' आंदोलन

## करपलेली पिके हातात घेऊन शेतकऱ्यांचा आक्रोश; दुष्काळ जाहीर करा, नुकसान भरपाई व पीकविमा द्या –आमटे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून कापूस, सोयाबीन, बाजरी यांसह खरीप पिकांची अक्षरशः राखरांगोळी झाली आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ दुष्काळ जाहीर करून नुकसानीचे पंचनामे करावेत, शेतकऱ्यांना एकरी ४० हजार रुपये अर्थात हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी तसेच थकीत पीकविमा तात्काळ जमा करावा, अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केली. या मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे यांच्या नेतृत्वाखाली




जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य 'हलगी बजाव' आंदोलन करण्यात आले. जिल्हाभरातून शेकडो शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांनी हातात करपलेले सोयाबीन, सुकलेले कापसाचे पीक आणि करपलेल्या बाजरीची कणसे घेऊन जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. हलगी वाजवत शासनाचे लक्ष शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे वेधण्यात आले. 'पीकविमा तात्काळ मिळालाच पाहिजे', 'दुष्काळ जाहीर झालाच पाहिजे', 'शेतकरी एकजुटीचा विजय असो' अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला. शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने मागील १५ ते २० दिवसांपासून बीड तालुक्यातील विविध गावांमध्ये बैठका घेऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनाला शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या

### सोयाबीन, कापूस, बाजरी घेऊन शेतकरी आंदोलनात

'हलगी बजाव' आंदोलनात शेतकरी हातात करपलेले सोयाबीन, सुकलेले कापसाचे दाणे आणि दाणे न भरलेल्या बाजरीच्या कणसे घेऊन सहभागी झाले. पिकांची झालेली दयनीय अवस्था शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष करपलेली पिके आंदोलनस्थळी आणली होती. आंदोलनात महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती.

### हलगीच्या नादाने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणला

शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हलगी वाजवून शासनाचे लक्ष वेधण्यात आले. हलगीच्या कडकडाटासह शेतकऱ्यांनी विविध मागण्यांच्या घोषणा दिल्याने संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला.

संख्येने उपस्थिती लावली.

यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, डॉ. गणेश ढवळे, ज्येष्ठ शेतकरी नेत्या सुशीलाताई मोराळे, बाळासाहेब मोरे, अशोकराव येडे, ज्ञानेश्वर राऊत, रामधन जमले, कुलदीप करपे, हनुमान घोडके, राजू गायके, खाजाभाई पठाण, दीपक जाधव, प्रदीप घुमरे, बळीराम मेहेत्रे, सतीश विसाफे, मच्छिंद्र साठे, शाम पांढरे, खंडू गाडेकर, धनंजय सागर, अण्णा वाणी, रोहिदास मस्के, मुसा बेग, चांद बॅग, राजाभाऊ साळुंखे, विक्रम साळुंखे, विष्णू साळुंखे, सुलेमान पठाण, मुसा पठाण, विक्रम शिंदे, दिलीप शिंदे, मशरूम साळुंखे, सुरेश साळुंखे आदींसह बीड तालुक्यातील ३० ते ३५ गावांमधील शेतकरी उपस्थित होते.

## डांबून मारहाण केल्याप्रकरणी जामीन मंजूर – ॲड. तेजस नेहरकर

बीड । प्रतिनिधी

वडवणी पोलीस ठाणे हद्दीत गो-शाळेतील मजुरांना डांबून ठेवून मारहाण केल्याचा आरोप असलेल्या प्रकरणातील आरोपी बाबुराव साहेबराव फड व भागचंद दराडे यांना न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणी फिर्यादी भगवान नारायण शहाणे यांच्या तक्रारीवरून वडवणी पोलीस ठाण्यात क्र. ०१८०/२०२६ दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणात बंधबीगार पद्धती (उच्चाटन)



अधिनियम, १९७६ मधील कलम १६ व २० तसेच भारतीय न्याय संहिता (), २०२३ मधील कलम ११८(१), १२६(२), १२७(२), १२७(३), १२७(४), ३(५), ३५१(२) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, दिनांक १५ जुलै २०२६ ते १ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मजुरीच्या कामासाठी नेण्यात आलेल्या व्यक्तींना गो-शाळेच्या ठिकाणी बंदिस्त डांबून ठेवून मारहाण करून वेट बिगारी काम करून घेतल्याचा व बाहेर जाण्यास प्रतिबंध केल्याचा तसेच इतर ४ ते ५ लोक पान ३ वर

## परळी मतदारसंघातील लोखंडी सावरगाव ते बर्दापूर फाटा रस्ता आता होणार चौपदरी : धनंजय मुंडेंच्या मागणीला यश

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील बीड व लातूर जिल्ह्यांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ – ब मधील लोखंडी सावरगाव ते लातूर रोडवरील बर्दापूर फाटा या दोन पदरी रस्त्याचे आता चौपदरीकरण होणार असून, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी यासाठी यशस्वी पाठपुरावा केला.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या कामास धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार मंजुरी दिली असून सुमारे १७.५० किमी लांबीच्या चौपदरीकरण कामासाठी १०४.४९ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे, तसेच या कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली असल्याने लवकरच कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.



वाढती भरधाव वाहतूक आणि रस्त्यालगतची गावे यामुळे बीड व लातूर या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या या प्रमुख राष्ट्रीय महामार्गावरील बीड जिल्हा हद्द ते लातूर जिल्हा हद्द हा रस्ता दोन पदरी असल्याने नेहमी अपघात घडत होते. याचाच विचार करून धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा हद्दीतील या रस्त्याचे लातूर जिल्हा हद्दीप्रमाणेच चौपदरीकरण करण्याची विनंती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे दिल्ली येथे प्रत्यक्ष भेटून केली होती. त्यानुसार या कामाला आता निधी मंजूर करण्यात आला असून, लवकरच बीड जिल्हा हद्दीतील लातूर रोड (लोखंडी सावरगाव ते बर्दापूर फाटा) आता चौपदरी होणार आहे.

याबद्दल श्री मुंडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

### धनंजय मुंडेंनी हे रस्ते केले चकाचक

या रस्त्यापूर्वी धनंजय मुंडे यांनी परळी मतदारसंघातील परळी ते बर्दापूर, परळी ते धर्मापुरी, परळी ते सिरसाळा, परळी ते सोनपेठ, अंबाजोगाई ते मांडेखेल – नाथरा मार्गे सोनपेठ, असे विविध रस्ते चकाचक केले आहेत. तर परळी शहर बायपास व परळी ते गंगाखेड रस्त्याचेही काम अंतिम टप्प्यात आहे. यामुळे परळीकडे येणारे सर्वच रस्ते आता चकाचक झाले आहेत!

## आष्टी, पाटोदा, शिरूरच्या पाणीप्रश्नासाठी २८ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा –भीमराव धोंडे

बीड । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुक्यातील तीव्र पाणीटंचाई आणि शेतीच्या सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी आमदार भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली २८ सप्टेंबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर लोकशाही मार्गाने भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे अशी माहिती मा आ. भीमराव धोंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या प्रकार परिषदेला माजी जि प सदस्य साहेबराव वनवे राष्ट्रवादीचे युवा नेते दीपक घुमरे डॉक्टर अजय



धोंडे यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते या मोर्चा संदर्भात माहिती देताना माजी आमदार भीमराव धोंडे पुढे म्हणाले की कृष्णा व गोदावरी खोऱ्यातील हक्काचे पाणी देण्याची मागणीआष्टी, पाटोदा आणि शिरूर हा भाग कायम दुष्काळग्रस्त असून येथे शेतीसह पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सातत्याने गंभीर बनत आहे. कृष्णा खोरे प्रकल्पातून आष्टी तालुक्यासाठी मंजूर असलेल्या ५.६८ टीएमसी पाण्यापैकी केवळ १.६८ टीएमसी पाणी उपलब्ध झाले असून उर्वरित ४.०० टीएमसी पाणी अद्याप मिळालेले नाही. हे उर्वरित पाणी तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे, तसेच गोदावरी व कृष्णा खोरे प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून तिन्ही तालुक्यांना त्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी ठाम मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

प्रमुख मागण्या:पाण्याचा कोटा उपलब्ध करणे: कृष्णा खोऱ्यातील मंजूर कोट्यापैकी उर्वरित ४.०० टीएमसी पाणी आष्टी तालुक्यास तातडीने देणे. पान ३ वर

## प्रत्येक बुथ जिंकण्यासाठी भाजपा कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे - संजय आंधळे

वडवणी । प्रतिनिधी

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी व भारतीय जनता युवा मोर्चाने वडवणी तालुक्यात संघटनात्मक बांधणीला अधिक वेग देण्यास सुरुवात केली असून, त्याचाच एक भाग म्हणून रविवार, दि.१३ सप्टेंबर २०२६ रोजी भाजपा बीएलए २ व पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या बैठकीत बूथनिहाय संघटन मजबूत करणे, मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवणे आणि आगामी निवडणुकांसाठी प्रभावी रणनीती आखणे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस बाजार समितीचे माजी



सभापती दिनकरराव आंधळे, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजयभाऊ आंधळे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, भाजपा जिल्हा सचिव मच्छिंद्र झाटे आणि भाजपा ज्येष्ठ नेते गुरुप्रसाद गुरसाळी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजयभाऊ आंधळे यांनी आगामी राजकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर बूथ पातळीवरील संघटन अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित केली. भाजपाची खरी ताकद ही मोठ्या नेत्यांमध्ये नव्हे, तर बूथवर अहोरात्र काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यामध्ये आहे. त्यामुळे प्रत्येक बीएलए–२ ने आपली जबाबदारी केवळ पद म्हणून न पाहता पक्षाच्या विजयाची महत्त्वपूर्ण जबाबदारी म्हणून स्विकारली पाहिजे. प्रत्येक बूथवर कार्यकर्त्यांची मजबूत फळी उभी करुन मतदारांशी सातत्यपूर्ण संवाद साधणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि पक्षाच्या विचारांशी त्यांना जोडणे हे आपले प्रमुख ध्येय असले पाहिजे, असे संजय आंधळे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, निवडणुकीच्या काही दिवस आधी सक्रिय होवून विजय मिळवता पान ३ वर

## शेतात विजेचा शॉक लागून जिवाचीवाडी येथील शेतकऱ्याचा मृत्यू

केज । प्रतिनिधी

जिवाचीवाडी (ता. केज) येथील रामकिशन (उर्फ अण्णा) लक्ष्मण चौरे यांचा रात्री शेतात काम करत असताना विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी (दि. १५) रात्री घडली. या घटनेमुळे जिवाचीवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



रामकिशन उर्फअण्णा चौरे हे रात्रीच्या वेळी शेतात काम करीत असताना अचानक विजेच्या वायरचा स्पर्श झाल्याने त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला. या दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर त्यांना तातडीने विडा येथील दवाखान्यात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर विडा येथील दवाखान्यात त्यांच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात आली. या तपासणीत विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले.

मनमिळाऊ स्वभावामुळे परिचित

रामकिशन उर्फअण्णा लक्ष्मण चौरे हे अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे आणि सर्वांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या आकस्मिक निधनाने कुटुंबीय, आई वडील पत्नी दोन भाऊ दोन बहीनी दोन मुले एक मुलगी असा परिवार व नातेवाईक तसेच मित्रपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या निधनाची बातमी पान ३ वर



## आठ दिवसात आश्वासन न पाळल्यास जागर प्रतिष्ठानचा पुन्हा आंदोलन करणार

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या २०२५/२६ हंगामातील हक्काच्या पिक विमासाठी जागर प्रतिष्ठानच्या वतीने विशाल जाधव यांनी आमरण उपोषण केले होते त्यादरम्यान माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी पीक विम्याचे विषयावर मुख्यमंत्र्यांसोबत बैठक करून देतो असे आश्वासन दिले होते परंतु एक महिना होत आला तरीही बैठकीचे कुठलेही नियोजन न झाल्याने दि १६ सप्टेंबर बुधवार रोजी पान ३ वर

## बीड नगर परिषदेतर्फे तारांगण व विज्ञान उद्यान प्रकल्पाचे ऑनलाइन भूमिपूजन– शेख निजाम

बीड । प्रतिनिधी

बीड शहराच्या विकासामध्ये महत्त्वाची व अजितदादा पवार यांनी दिलेले शब्द साकार करण्यासाठी बीड शहराचया वैभवात भर घालणाऱ्या आ. विजयसिंह पडीत यांच्या पाठपुरावाने होत असलेल्या तारांगण व विज्ञान उद्यान प्रकल्पाचे (ऑनलाइन) भूमिपूजन सोहळा गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. बीड नगर परिषद प्रशासनाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

रेल्वे स्थानक, पालवण रोड, बीड येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ गंगाबाई संभाजी शिंदे यांच्यासह पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांची प्रमुख व शुभहस्ते कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती आमदार व माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब, आमदार प्रकाश दादा साळुंके, आमदार विजयसिह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाचे जिल्हाअध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, नगरअध्यक्ष प्रेमलता ताई पारवे उपस्थित राहणार आहेत.

विद्यार्थ्यांसाठी विज्ञानाधारित

सुविधा बीड शहरात तारांगण आणि विज्ञान उद्यान उभारण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी तसेच विज्ञानप्रेमी नागरिकांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. यामुळे खगोलशास्त्र, विज्ञान आणि तंत्रज्ञानाविषयी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून माहिती मिळण्यास मदत होऊ शकते.

बीड शहरातील विद्यार्थी, विज्ञान व संशोधनप्रेमी नागरिकांसाठी पान ३ वर

# माजलगाव धरणाची उंची वाढविताना शेतकऱ्यांची एक आर जमीनही संपादित होणार नाही

## जमीन संपादनाची गरज भासल्यास प्रकल्पच रद्द करण्याची आमदार प्रकाश सोळंके यांची पत्रकार परिषदेत ग्वाही

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव धरणाची उंची ०.५० मीटरने वाढविण्याच्या प्रस्तावामुळे शेतकरी व परिसरात सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रकाश सोळंके यांनी महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली आहे. धरणाची उंची वाढविताना कोणत्याही शेतकऱ्याची एक आर जमीनदेखील संपादित करण्याची आवश्यकता निर्माण होणार नाही,अशी ग्वाही आ.प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत दिली

यासंदर्भात आ.प्रकाश सोळंके यांनी दि १६ सप्टेंबर बुधवार रोजी



येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालय घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की माजलगाव धरणाच्या उंचीवाढी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जमीन संपादनाची गरज भासल्यास शासनाकडून प्रकल्पच रद्द करण्याचा निर्णय घेतला जाईल, असेही आमदार सोळंके यांनी स्पष्ट केल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तावित उंचीवाढीमुळे जमीन गमावण्याची भीती असलेल्या शेतकऱ्यांच्या चिंतेला काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनी व उपजीविकेचे संरक्षण महत्त्वाचे

धरणाची उंची वाढविण्याच्या प्रस्तावामुळे धरणालगतच्या तसेच पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये जमिनीवर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत चर्चा सुरू झाली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी आणि त्यांच्या उपजीविकेचे संरक्षण महत्त्वाचे असल्याचे आमदार सोळंके यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे.

धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव हा पाणीसाठा वाढविणे आणि उपलब्ध जलसंपत्तीचा अधिक प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने चर्चेत आहे.

### जमीन संपादनाची वेळ आली तर प्रकल्प रद्द

आमदार प्रकाश सोळंके यांच्या म्हणण्यानुसार, धरणाची उंची वाढविण्यासाठी जर जमीन संपादनाची आवश्यकता निर्माण झाली, तर अशा परिस्थितीत प्रकल्प रद्द करण्याचा पर्याय स्वीकारला जाईल.त्यामुळे प्रस्तावामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे संरक्षण हा या विषयातील महत्त्वाचा मुद्दा ठरणार आहे.

### प्रस्तावामुळे चर्चेला उधाण

माजलगाव धरणाची उंची ०.५० मीटरने वाढविण्याच्या प्रस्तावामुळे माजलगाव तालुक्यात या विषयावर विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली आहे. धरणाची उंची वाढल्याने अतिरिक्त पाणीसाठा निर्माण होण्याची शक्यता असून त्याचा सिंचनासाठी कितपत उपयोग होईल,तसेच त्याचा शेतकरी आणि नागरिकांवर काय परिणाम होईल, याबाबत विविध मते व्यक्त होत आहेत. दरम्यान, माजलगाव धरणाच्या उंचीवाढीचा प्रस्ताव आणि त्यातून होणारे संभाव्य परिणाम याबाबत शासनस्तरावर पुढील निर्णय काय होतो, याकडे माजलगाव तालुक्यातील नागरिक व शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

मात्र,या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या जमिनीवर परिणाम होणार असल्यास त्याचा विचार करूनच पुढील निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका त्यांनी पत्रकार परिषदेत मांडली आहे.या पत्रकार परिषदेला बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे,माजी सभापती कल्याण आबुज, बाजार समितीचे माजी सभापती संभाजी शेजुळ,माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ,पं.स.माजी उपसभापती वासिम मनसबदार,कृ.बा.स.चे संचालक डॉ उध्दव नाईकनवरे यांची उपस्थिती होती.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26